करावें असें सुचविलें आहे. **विगलित०** ज्याचा संसाररूप बंध नष्ट झाला आहे असा. 'अविद्याच बंध आहे' असें वार्तिक असल्यामुळे या ठिकाणीं संसार शब्दानें संसारकारण अविद्या घ्यावी. ह्या प्रथम प्रकरणांत विद्यारण्यस्वामींनीं मुख्यत: वेदान्त शास्त्राच्या अभ्यासाचा अधिकार प्राप्त होण्यास कोणकोणची सामग्री लागते तें सांगितलें आहे, असें उपक्रमोपसंहारादि तात्पर्यनिर्णायक सहा सूचकांवरून वाटतें. उपक्रम म्हणजे ग्रंथाचा आरंभ होय. ह्या ग्रंथाचा खरा आरंभ 'तत्पादाम्बुरुहद्वंद्व०' या द्वितीय श्लोकांत झाला आहे. व उपसंहार म्हणजे समाप्ति. ती ह्या प्रकरणाच्या 'इत्थं तत्त्वविवेकं' ह्या अंत्यश्लोकानें केली आहे. या दोन्ही. स्थळीं अधिकारसामग्रीचेंच मुख्यत: प्रतिपादन केलें असल्यामुळें हेंच उपक्रमोपसंहार नामक प्रथम लिंग, 'भाने न विषये स्पृहा' 'कुर्वते कर्म भोगाय०' 'नैव निर्वृति' इत्यादिकांत पुन: जीवदशा सांगितल्यामुळें हें अभ्यास नावाचें दुसरें लिंग, 'ध्यातृध्याने० सचिवाद्भवेत्' इत्यादि ग्रंथानें चितैकाग्र्यरूप अप्रसिद्ध गोष्ट सांगितल्यामुळें हें अपूर्वता नामक तिसरें लिंग, 'अमुना वासनाजाले०' 'अपरोक्षं प्रसूयते' इत्यादि चरणांनीं या अभ्यासापासून काय होतें तें सांगितलें असल्यामुळें फल नांवाचें चवथें लिंग, 'यथा दीपो निवातस्थो०' या श्लोकानें स्वत: निरूपण केलेल्या समाधीची अन्य वाक्यानें स्तुति केल्यामुळें हें अर्थवाद नामक पांचवें लिंग, व 'अनादाविह संसारे०' 'अनेन विलयं यान्ति०' धर्ममेघमिमं प्राहु:०' इत्यादि चरणांत याविषयीं युक्ति सुचविल्यामुळें ह उपपत्ति नांवाचें सहावें लिंग होय. ह्या सहा तात्पर्य-ग्राहक लिंगांवरून चित्तशुद्धीपासून समाधीपर्यंत शास्त्राधिकारांची सर्व संपत्ति सांगितली आहे. या संपत्तिनिर्णयानेच ईश्वरविषयक भ्रामक समजूतहि दूर केली आहे. कारण मुक्तीचे अनेक भेद असल्यामुळें त्यांतील नित्य कोणची व अनित्य कोणती हें सर्वांनाच समजत नाहीं. पण या सामग्रीनें युक्त असलेल्या पुरुषाला शिव, विष्णु इत्यादि सगुण ब्रह्मांशीं तादात्म्य झालें असतां सायोज्य, सारूप्य, सार्ष्टि, सामीप्य व सालोक्य या पांच मुक्ति जरी क्रमानें मिळाल्या तरी ह्या सर्व सगुणविषयक असल्यामुळें आणि 'जें अल्प असतें त्यांत कधींच सुख नसतें' असा सर्वांचा अनुभव व श्रुत्यादि दुसरीं प्रमाणेंहि असल्यामुळें त्या गौण आहेत; मुख्य नव्हेत, असे निश्चयपूर्वक वाटतें. आणि त्यामुळें सगुण ब्रह्माचे ठिकाणी त्यांचें दृढ प्रेम रहात नाहीं. म्हणजे शुद्ध ब्रह्माचा सगुण ब्रह्मरूपी बंध नष्ट होतो॥६५

॥ श्री ॥

२ महाभूतविवेक:

'सदैव सोम्य इदं अग्र असीत् (छा. भा. अ. ६.२ १) या श्रुतीनें सृष्टीच्या पूर्वीं जें सद्रूप अद्वितीय ब्रह्म जगाचें कारण म्हणून सांगितलें आहे तें वाक् व मन यांचा विषय होत नाहीं. त्यामुळें इतर पदार्थाप्रमाणें त्याचें ज्ञान होऊं शकत नाहीं. म्हणून त्यांचे कार्य असल्यामुळे त्याची उपाधी, अशा भूतपंचकाच्या विवेकद्वारा त्याचें ज्ञान करून देण्यासाठीं ग्रंथकार उपोद्घातरूपानें भूतपंचकविवेकाची प्रतिज्ञा करितात-

सदद्वैतं श्रुतं यत्तत्पञ्चभूतविवेकत: ।
बोद्धुं शक्यं ततो भूतपञ्चकं प्रविविच्यते ॥१

अन्वयार्थ - [यत् सत् अद्वैतं श्रुतं तत् पंचभूतविवेकत: बोद्धुं शक्यं-] जें सत् अद्वैत तत्त्व छान्दोग्यांत श्रुत आहे; तें पंचभूतांच्या विवेचनानें जाणणें शक्य आहे. [तत: भूतपंचकं प्रविविच्यते-] यास्तव या प्रकरणांत भूतपंचकाचें विवेचन केलें जातें.

-आकाशादि पांच भूतांचा गुणांच्या योगानें भेद कसा होतो तें सांगण्यासाठीं प्रथम त्यांचे गुणच सांगतात-

शब्दस्पर्शौ रूपरसौ गन्धौ भूतगुणा इमे ।
एकद्वित्रिचतु:पञ्च गुणा व्योमादिषु क्रमात् ॥२

अन्वयार्थ- [शब्दस्पर्शौ रूपरसौ गंध: च इमे भूतगुणा: सन्ति-] शद्ब, स्पर्श, रूप, रस व गंध असे हे भूतांचें पांच गुण आहेत. [व्योमादिषु क्रमात् एकद्वित्रिचतु:पंच गुणा: वर्तन्ते-] 'पण पांच भूतांत हे पांची गुण राहतात कीं एकेका भूतांत एकेक राहतो ?' उत्तर-आकाशादि भूतांत क्रमाने एक, दोन, तीन, चार व पांच गुण राहतात.

प्रकाश:- छान्दाग्योपनिषदांत 'हे प्रिय श्वेतकेतो सृष्टीपूर्वी हें सर्व जग सद्रूपानेंच होतें' -अशा अर्थाची श्रुति आहे. पण आकाशादि भूतांच्या मायिक स्वरूपाविषयीं निश्चय झाल्यावांचून त्या सद्रूपाचा साक्षात्कार होणें शक्य नाहीं. यास्तव त्या पांच महाभूतांचें या प्रकरणांत परीक्षण केलें आहे. **शंका-** पण आकाशादि भूतांच्या विवेकाने अद्वैतभूत ब्रह्माचें ज्ञान होतें हें म्हणणेंच अयुक्त आहे. कारण आकाशादिभूतें व ब्रह्म यामध्यें अत्यंतवैलक्षण्य आहे. कारण-आकाशादि भूतें म्हणजेच द्वैत होय. मग द्वैताच्या विवेकानें अद्वैताचें ज्ञान कसें होणार ? अंधकाराच्या विवकानें प्रकाशाचा साक्षात्कार झाल्याचें कोठें आढळत का ? शिवाय तुमचें हें ब्रह्म असंग आहे. त्यामुळें तें द्वैतांत मिसळत नाहीं म्हणून द्वैतापासून तें वेगळेंहि काढतां येणार नाहीं. **समाधान-** पंचभूतादिद्वैतवर्ग सत्य नसून रज्जुसर्पाप्रमाणें भ्रमानें भासणारा अध्यस्त असल्यामुळें त्याचें खरें स्वरूप समजलें असतां त्याच्या अधिष्ठानाचा साक्षात्कार होणें साहजिक आहे. तात्पर्य तुमच्या शंकेला मुळींच जागा नाहीं. पृथक्करण एकंदर तीन, प्रकारांनीं होतें. (१) दूध व पाणी यांचें मिश्रण झालें असतां हंसाच्या चोंचीनें, 'किंवा मल व पाणी यांचे मिश्रण झालें असतां निवळीच्या बीनें, (२) समवायसंबंधद्वारा मिश्र झालेले जें सुवर्ण व कडें त्यांचें कारणकार्यभावानें व (३) शिंप व रूपें यांचें भ्रमानें ऐक्य झालें असतां शिंपीच्या अधिष्ठानाच्या ज्ञानानें होतें. पण वेदान्ताला त्यांतील शेवटचे मान्य आहे.

प्रकाश:- आकाशाचा शब्द, वायूचा स्पर्श, तेजाचे रूप, जलाचा रस, पृथ्वीचा गंध असे पांच धर्म असून आकाशांत एक, वायूंत दोन, तेजांत तीन, उदकांत चार व पृथ्वींत पांच गुण राहतात. ह्याचें विवेचन मूळ ग्रंथांत येणार आहे. ॥१॥ ॥२॥

-त्याचेंच अधिक स्पष्टीकरण-

प्रतिध्वनिर्वियच्छब्दो वायौ बीसीति शब्दनम् ।
अनुष्णाशीतसंस्पर्शो वह्नौ भुगुभुगुध्वनि: ॥३
उष्ण: स्पर्श: प्रभारूपं जल बुलुबलुध्वनि: ।
शीत: स्पर्श: शुक्लरूपं रसो माधुर्यमीरितम् ॥४
भूमौ कडकडाशब्द: काठिन्यं स्पर्श इष्यते ।
नीलादिकं चित्ररूपं मधुराम्लादिको रस: ॥५
सुरभीतरगन्धौ द्वौ गुणा: सम्यग्विवेचिता: ।

अन्वयार्थ- [वियच्छद्ब: प्रतिध्वनि:-] आकाशाचा प्रतिध्वनिरूप शब्द हाच एक गुण आहे. [वायौ बीसीति शब्दनं अनुष्णाशीतसंस्पर्श: च-] वायूंत 'बीसि' असा शब्द व उष्ण नाहीं व शीतहि नाहीं असा स्पर्श असे दोन; [वन्हौ भुगुभुगुध्वनि: उणस्पर्श: प्रभारूप च- अग्नींत 'भुगभुग्' असा शब्द, उष्ण स्पर्श व त्याची प्रभा हें रूप, असे तीन; [जलं बुलुबुलुध्वनि:, शीत: स्पर्श; शुक्लरूपं, रस: माधुर्य ईरितम्-] जलांत 'बुल् बुल् बुल्' असा शब्द, थंड स्पर्श, पांढरें रूप व मधुरता हा रस असे चार व [भूमौ कडकडाशब्द:, काठिन्यं स्पर्श: इष्यते नीलादिकं चित्ररूपं, मधुराम्लादिक: रस: सुरभीतरगन्धौ द्वौ-] पृथ्वींत 'कडकड् खडखड्' असा शब्द, कठिणपणा हा स्पर्श, निळें, पांढरें इत्यादि सहाप्रकारचें रूप, गोड, आंबट इत्यादि सहाप्रकारचा रस, सुवास व दुर्गंध हे

दोन गंध असे पांच गुण राहतात. [इति गुणा: सम्यक् विवेचिता:-] हें त्या गुणांचें स्पष्टपणें विवेचन केले.

प्रकाश:- अरण्यांत भव्य देवालयांत किंवा माळ जमिनीवर जाऊन ओरडलें असतां किंवा कांहीं वाजविलें असतां कसा प्रतिशब्द होतो त्याचे बहुतेक सर्वांना ज्ञान आहेच. या शब्दाला गुहादिकांसारख्या पोकळीवांचून अन्य कांहीं कारण दिसत नाहीं. त्यामुळें तो आकाशाचा शब्द असावा असा निश्चय होतो. वारा जोरानें वाहू लागला असतां त्याचा शब्द सर्व प्राण्यांना ऐकूं येतो व त्याचा शरीराला स्पर्श कसा होतो, तेंहि सर्वांना माहीत आहे. वायूचा स्पर्श हा मुख्य गुण असून शब्द हा त्याच्या कारणाचा (आकाशाचा) गुण ''कारणगुणा: कार्येऽनुवर्तन्ते'' - 'कारणगुण कार्यात' या न्यायानें आला आहे. या ठिकाणीं बीसी, बुलबुल, भुग् भुग् हे अनुकरणवाचक शब्द आहेत. अग्नि प्रदीप्त झाला असतां त्याचा ध्वनि भुग् भुग् असा होतो, त्याचा स्पर्श उष्ण आहे व प्रखरता हा त्याच्या अंगचा गुण आहे. पूर्वीचें दोन त्याच्या कारणांचे आहेत हें उघडच आहे. असेंच पुढें समजावें. माधुर्य हा जलाच्या अंगचा स्वाभाविक, व गंध हा पृथ्वीच्या अंगचा स्वाभाविक गुण होय. काळें, पांढरें, तांबडें, हिरवें, पिवळें व चित्रवर्ण असे रूपाचे सहा व गोड, आंबट, कडु, तिखट, खारट, व तुरट असे रसाचे सहा भेद आहेत. ॥ ३.५॥

-याप्रमाणें गुणांच्या द्वारा भूतांचे भेद सांगून आतां ह्या सहाव्या श्लोकाच्या उत्तरार्धात कार्यावरूनहि त्याचे भेद सांगण्यासाठीं अगोदर ज्ञानेंद्रियें हीं त्यांचीं कार्ये सांगतात-

श्रोत्रंत्वक्चक्षुषी जिह्वा घ्राणं चेन्द्रियपञ्चकम् ॥६

अन्वयार्थ- [श्रोत्रं त्वक्चक्षुषी जिव्हा घ्राणं च इंद्रियपंचकं-] श्रोत्र, त्वक्, नेत्र, जिव्हा व घ्राण हें इंद्रिय पंचक होय.

प्रकाश:- तत्त्वविवेकांत सांगितल्याप्रमाणें केवल पंचीकृत पंचमहाभूतांच्या पृथक् सत्त्वगुणापासून झालेलें असें हें श्रोत्रादि ज्ञानेंद्रियपंचक आहे ॥६॥

-त्या इंद्रियांचीं स्थानें व पृथक् व्यापार सांगतात-

कर्णादिगोलकस्थं तच्छब्दादिग्राहकं क्रमात् ।
सौक्ष्म्यात्कार्यानुमेयं तत्प्रायो धावेद्बहिर्मुखम् ७

अन्वयार्थ- [तत् कर्णादिगोलकस्थं क्रमात् शब्दादिग्राहकं अस्ति-] तें इंद्रियपंचक कर्णादि गोलकांत राहतें व क्रमानें शब्दादि विषयाचें ग्रहण करितें. [सौक्ष्म्यात् तत् कार्यानुमेयं-] तें फार सूक्ष्म असल्यामुळें केवल कार्यावरूनच त्याचें ज्ञान होतें. [प्राय: बहिर्मुखं धावेत्-] तें बहुतकरून बहिर्मुख धांवत असतें.

प्रकाश:- श्रोत्र कानांत, त्वक् सर्व शरीरांत, चक्षु डोळ्यांत, रसना जिव्हेंत व घ्राण नाकांत राहतें. म्हणजेच कर्णादिक हीं खरीं इंद्रियें नसून ती श्रोत्रादिकांचीं राहण्याचीं स्थानें आहेत. यांनाच गोलक असें म्हणतात. ह्या श्रोत्रादि इंद्रियांच्या अस्तित्वाविषयीं प्रमाण काय ? असा कोणी प्रश्न करील म्हणून सांगतात तीं श्रोत्रादि इंद्रियें अति सूक्ष्म असल्यामुळें जरी प्रत्यक्ष दिसत नाहींत, तरी त्यांच्या व्यापारावरून त्याच्याविषयीं अनुमान करितां येतें. कसें म्हणशील तर पहा-आपणाला जी रूपाची उपलब्धि (ज्ञान, साक्षात्कार) होते ती करणजन्या (साधनामुळें होणारी) आहे. उदाहरण-च्छेदन क्रियेचे जशी च्छेदन ही क्रिया कुऱ्हाड, तोडणारा, तोडण्याची वस्तु (काष्ठादि) इत्यादि असल्यावांचून होत नाहीं, तसेच रुपादि ज्ञान हें रुपमान् पदार्थ, रूप जाणणारा व रूपाचें साधन (नेत्र) हीं असल्यावांचून होणें शक्य नाहीं. यास्तव ज्ञाता-जीव, व ज्ञेय-विषय यांचा व्यापार होण्यास कुऱ्हाडीप्रमाणें ज्याची अत्यंत आवश्यकता आहे अशी तीं श्रोत्रादि इंद्रियें होत. तीं सर्वहि अपंचीकृत पंचमहाभूतांपासून झालेलीं असल्यामुळें अति सूक्ष्म असतात. तीं सर्वहि बहुतकरून बहिर्मुख असतात.

प्राय: या शब्दानें ''पराश्चि खानि व्यतृणत्स्वयम्भू:'' (कठ ४-१) ह्या श्रुतीवरून त्यांचा स्वभाव जरी बहिर्मुख राहण्याचा आहे, तरी एकाद्या धीर पुरुषाला त्यांना अंतर्मुख करून आत्मसाक्षात्कार करून घेता येतो. असें सुचविलें आहे. ॥७॥

-मागच्या श्लोकांतील 'प्राय:-' शब्दानें सुचविलेलें इंद्रियांचें केव्हां केव्हां आंतर विषयग्राहकत्व स्पष्ट करून दाखवितात-

कदाचित्पिहिते कर्णे श्रूयते शब्द आन्तर: ।
प्राणवायौ जाठराग्नौ जलपानेऽन्नभक्षणे ॥८
व्यज्यन्ते ह्यान्तरा: स्पर्शा मीलने चान्तरं तम:
उद्गारे रसगन्धौ चेत्यक्षाणामान्तरग्रह: ॥९

अन्वयार्थ- [कदाचित् कर्णे पिहिते सति-] एखादे वेळीं कान झांकले असतां [प्राणवायौ जाठराग्नौ च विद्यमान: आंतर: शब्द:श्रूयते-] प्राणवायु व जठराग्नि यांत असणारा देहांतील शब्द ऐकूं येतो. [जलपाने अन्नभक्षणे च आंतरा: स्पर्शा: व्यज्यन्ते-] उदकपान व अन्नभक्षण केलें असतां आंतील स्पर्श समजतो. [मीलने च आंतरं तम: उपलभ्यते-] नेत्र मिटले असतां आंतील अंधकार प्रत्ययाला येतो. [उद्गारे सति रसगंधौ गृह्येते-] ढेंकर वगैरे आली असतां आंतील रस व वास समजतात. [इति अक्षाणां आन्तरग्रह: भवति-] सारांश याप्रमाणें इंद्रियें आंतील विषयांचाहि अनुभव घेतात.

प्रकाश:- करांगुलीनें कानांचीं छिद्रें झाकिलीं असतां प्राणवायु इत्यादिकाच्या ठिकाणीं होणारा शब्द ऐकूं येतो; ही गोष्ट सर्वांच्या अनुभवाची आहे. तसेंच थंडगार पाणी प्यालें असतां किंवा एकादा अति उष्ण पदार्थ गिळला असतां त्याचा उदरांत होणारा स्पर्श स्पष्टपणें प्रत्ययास येतो. नेत्र मिटले असतां सर्व प्राण्यांना शरीरांतील अंधकाराचा प्रत्यक्ष अनुभव येतो. हा अंधकार केवळ प्राकृतांनाच दिसत असतो. आत्मज्ञानी पुरुषाला नेत्र मिटल्यावर अंधकार न दिसतां वृत्तिज्ञानरूप प्रकाशच दिसत असतो. ढेकरेबरोबर आंगांतील कडु, आंबट, इत्यादि रस व उबट, कुजकट वास अनुभवास येतात. यावरून बाह्य विषयांप्रमाणें ज्ञानेंद्रियांना देहान्तर्गत विषयाचेंहि ज्ञान होतें असें सर्वानुभवसिद्ध झालें.॥८-९॥

-याप्रमाणें ज्ञानेंद्रियांचे व्यापार सांगून 'कर्मेंद्रियें नाहींत' असें म्हणणाऱ्या वाद्याला त्यांच्या अस्तित्वाची प्रतीति आणून देण्यासाठीं त्यांचे व्यापार सांगतात-

पञ्चोक्त्यादानगमनविसर्गानन्दका: क्रिया: ।
कृषिवाणिज्यसेवाद्या: पञ्चस्वन्तर्भवन्ति हि ॥१०

अन्वयार्थ- [उक्त्यादानगमनविसर्गानंदका: पंच क्रिया: प्रसिद्धा:-] बोलणें, ग्रहण करणें, जाणें, पुरीषाचा विसर्ग करणें व स्पर्शसुख घेणें, ह्या पांच क्रिया प्रसिद्ध आहेत. [हि कृषिवाणिज्यसेवाद्या: पंचसु अंतर्भवन्ति-] व कृषि-शेतकी, व्यापार, सेवा इत्यादि अन्य क्रियाहि या पांचात अंतर्भूत होतात.

प्रकाश:- 'उक्ति... आनन्दका' :- हा द्वन्द समास आहे. भाषणादि क्रिया क्रमानें वागादि इंद्रियांच्या योगानें होत असतात. शेतकीसारख्या दुसऱ्या हजारों क्रिया असतांना पांचच क्रिया असा निश्चय कसा करितां येईल ? असा प्रश्न उद्भवूं नये म्हणून दुसऱ्या अर्धानें सर्वहि क्रिया या पांचांत येतात असे स्पष्टपणें सांगितलें आहे. या क्रियांवरून त्यांच्या साधनांविषयीं पूर्वीप्रमाणें अनुमान करितां येतें. ॥१०॥

पण तीं क्रियाजनक कर्मेंद्रियें कोणती, तें सांगतात-

वाक्पाणिपादपायूपस्थैरक्षैस्तत्क्रियाजनि: ।
मुखादिगोलकेष्वास्ते तत्कर्मेन्द्रियपञ्चकम् ॥११

अन्वयार्थ- [वाक्पाणिपादपायूपस्थै: अक्षै: तत्क्रियाजनि: भवति-] वाक्, हस्त, पाद, गुद व शिश्न ह्या पांच इंद्रियांनीं त्या क्रिया उत्पन्न होतात. [तत् कर्मेंद्रियपंचकं मुखादिगोलकेषु आस्ते-] या

कर्मेंद्रियपंचकाचीं स्थानें सांगतात-तें कर्मेंद्रियपंचक मुखादि गोलकांमध्यें राहतें.

प्रकाश:- शंका:- रसनेंद्रियाप्रमाणें वागिंद्रियसुद्धां जिव्हेंत राहतें असें म्हणणेंच योग्य आहे. कारण रसज्ञानाप्रमाणें भाषणालाहि जिव्हेची अत्यंत आवश्यकता असते. पण असें असतांना जिव्हेला सर्वथैव सोडून तत्स्थानभूत मुखांत तें राहतें असें कां म्हटलेंत ? **समा०**- वाणीचे परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी असे एकंदर चार भेद आहेत. त्यांतील वैखरीला जिव्हेची अत्यंत आवश्यकता असते हें जरी खरें आहे, तरी वाणीच्या इतर भेदांना तिची कांहींएक आवश्यकता नसते. यास्तव, वागिंद्रियाचें मुख हें स्थान आहे, असा सामान्य निर्देश केला आहे. वैखरीचा व्यवहार सुद्धां केवळ जिव्हेनेंच होतो असें नाहीं तर त्याला सुद्धां अकारादि निरनिराळ्या वर्णांप्रमाणें निरनिराळीं स्थानें लागतात. उच्चारासाठीं स्थान, करण आणि प्रयत्न यांची फार आवश्यकता आहे असें व्याकरणांत स्पष्टपणें सांगितलें आहे ॥११॥

-आतां या दहा इंद्रियांना प्रेरणा करणाऱ्या मनाचें स्थान व कर्म सांगतात-

मनो दशेन्द्रियाध्यक्षं हृत्पद्मगोलके स्थितम् ।
तच्चान्त:करणं बाह्येष्वस्वातन्त्र्याद्विनेन्द्रियै: ॥१२

अन्वयार्थ- [मन: दशेन्द्रियाध्यक्षं अस्ति-] मन दहाहि इंद्रियांचें अध्यक्ष आहे. [तत् हृत्पद्मगोलके स्थितम्-] तें हृदयकमलरूप गोलकांत असतें [च इन्द्रियै: विना बाह्येषु अस्वातन्त्र्यात् तत् अन्त:करणं भवति-] व इंद्रियांच्या साहाय्यावाचून बाह्य विषयांविषयीं तें स्वतंत्र नसल्यामुळें त्याला अंतरिंद्रिय असें म्हणतात.

प्रकाश:- मनाच्या प्रेरणेवांचून कोणत्याच इंद्रियाची विषयाकडे प्रवृत्ति होत नाहीं. मनाचा निरोध झाला असतां सर्व इंद्रियांचा आपोआपच निरोध होत असतो. म्हणून मनाला इंद्रियांचा अध्यक्ष (राजा, स्वामी, नियंता) असें येथें म्हटलें आहे. हें मन हृदयांत असणाऱ्या आकशांत राहतें. हें जरी सर्व इंद्रियांचें प्रेरक आहे; तरी ह्याला इंद्रियांच्या सहाय्यावांचून बाह्यविषयांचा अनुभव घेतां येत नाहीं. म्हणजे स्वतंत्रपणें त्याला बाह्य विषयांचें ज्ञान होत नाहीं. यास्तव पंडित त्याला अंत:करण असें म्हणतात; ॥१२॥

-मन इंद्रियाध्यक्ष कसें तेंच स्पष्ट करितात-

अक्षेष्वर्थार्पितेष्वेतद्गुणदोषविचारकम् ।
सत्त्वं रजस्तमश्चास्य गुणा विक्रियते हि तै: ॥१३

अन्वयार्थ- [अक्षेषु अर्थार्पितेषु सत्सु-] इंद्रियें विषयांमध्यें स्थापिलीं असतां [एतत् मन: गुणदोष-विचारकं भवति-] हें मन त्यांच्या गुणदोषांचा विचार करितें. [अस्य सत्त्वं रज: तम: च इति गुणा: सन्ति-] ह्याचे सत्त्व, रज व तम असे तीन गुण आहेत. [हि तै: तत् विक्रियते-] कारण हें त्या गुणांच्या योगानें विकार पावतें.

प्रकाश:- श्रोत्रादि इंद्रियें शब्दादि विषयांशीं संयुक्त झालीं असतां त्यांना त्यातून निघावें असें वाटतच नाहीं. कारण कधीं जन्मांत घृत न खाल्लेल्या दरिद्र्याला तेलच जसें अमृत वाटतें, तसें प्राकृत लोकांना स्वरूपानंदाचा यत्किंचित्हि अनुभव नसल्यामुळें, हें विषयसुखच परमानंद वाटतो. पण अंत:करण सर्वदा विषयाची निवड करीत असतें. त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला जे विषय हितकर वाटतात त्यांचे तें ग्रहण करिते व जे अनर्थकर वाटतात त्यांचा तें त्याग करितें. अंत:करणाचे सत्त्वादि तीन गुण आहेत; व तें स्वरूपत: निर्मल असतां ह्यांच्या योगानें तें रागी, लोभी, मत्सरी, क्रोधी, द्वेषी इत्यादि प्रकारे दोषी होतें. अंत:करणाला ह्या गुणांच्या योगानें जशी सत् किंवा असत् योग्यता येते तसें तसें तें विषयांचें इष्टत्व किंवा अनिष्टत्व दाखवितें. याकरितांच जगांत सर्वत्र रुचिवैचित्र्याचा अनुभव येतो. एकाद्याला सदाचार आवडतात तर एकादा दुर्वृत्तता हाच सदाचार असें

मानतो. कोणी धार्मिक असतो, कोणी नास्तिक असतो, कोणी व्यसनाधीन होऊन व्यसनमय झालेला दिसतो, तर कोणी विद्यार्थी विद्यारूप होऊन जातो. सारांश, प्रत्येक प्राण्याचीं कृत्यें त्याच्या अंत:करणावर अवलंबून असतात, व अंत:करण पूर्वसंस्कारावर अवलंबून असतें. यास्तव प्रत्येक मनुष्यानें अंत:करणाला सात्त्विक संस्कारच होतील असा प्रयत्न करीत असावें. असो. आत्म्याला सर्वसाधारण ज्ञान मात्र असतें. व इंद्रियांना केवल रुपादि स्वविषयाचेंच ज्ञान होतें. पण विषयांच्या गुणदोषांचा विवेक करण्याची या उभयतांमध्येंहि शक्ति नसल्यामुळें तिसरें एक अंत:करण आहे असें मानावें लागतें. **अर्थार्पितेषु**-शब्दादि इष्ट विषयाचें ग्रहण करण्यास्तव इंद्रियांना नियुक्त केलें असतां. **विक्रियते**-सत्त्वादि गुणांपासूनच मनाची उत्पत्ति झाल्यामुळें ते गुण ह्याचें उपादान कारण आहे. यास्तव त्या गुणांनीं मन विकार पावतें. म्हणजे सुख, दु:ख व मोह या सत्त्वादि गुणांच्या कार्यरूपानें तें परिणाम पावतें, असा अर्थ करावा असें अच्युतराय म्हणतात. ॥१३॥

-सत्त्वादि गुणांच्या योगानें मनाला विकार कसे होतात, तें आतां सांगतात-

वैराग्यं क्षान्तिरौदार्यमित्याद्या: सत्त्वसम्भवा: ।
कामक्रोधौ लोभयत्नावित्याद्या रजसोत्थिता: ॥
आलस्यभ्रान्तितन्द्राद्या विकारास्तमसोत्थिता: ॥१४

अन्वयार्थ- [वैराग्यं क्षान्ति: औदार्य इत्याद्या: सत्त्वसम्भवा:-] विरक्ति, क्षमा, उदारता इत्यादि विकार सत्त्वापासून होतात: [कामक्रोधौ लोभयत्नौ इत्याद्या: रजसा उत्थिता:-] काम, क्रोध, लोभ, यत्न इत्यादि रजोगुणापासून झाले आहेत [तथा आलस्यभ्रांतितंद्राद्या: तमसा उत्थिता: विकारा: सन्ति-] व आळस, भ्रांति, ग्लानि इत्यादि तमोगुणापासून झालेले विकार आहेत.

प्रकाश:- या ठिकाणीं सत्त्वादि विकारांची केवल दिशा मात्र दाखवली आहे. सर्व द्वैतप्रपंच दृश्य असल्यामुळें दु:खरूप, स्वत:ची सत्ता नसलेला, क्षणोक्षणीं बदलणारा, नाशिवंत इत्यादि अनेक अनर्थांनीं भरलेला आहे. म्हणून त्यास तुच्छ मानून नित्य आत्म्याकडे अनुसंधान ठेवणें हेंच **वैराग्य** होय. एकाद्यानें आपले कितीहि अपराध केले असले तरी त्याला अपकार न करितां त्याच्या कल्याणाची इच्छा करणें ही **क्षमा**, व मनाला क्षुद्र विचार करण्यांत गढूं न देतां सर्वदा प्रसन्न व उदार ठेवणें हें **औदार्य** होय. विषयचिंतनानंतर त्यांच्या प्राप्तीची इच्छा होणें हा **काम**, त्याला काहीं प्रतिबंध झाला असतां उत्पन्न झालेली वृत्ति हा **क्रोध**, कामित विषय प्राप्त झाला असतां त्याचा अधिकाधिक संग्रह करण्याची इच्छा हा **लोभ** व अधिक संग्रहार्थ जे सेवादि प्रयास करावे लागतात तो यत्न होय. कांहीं न करितां स्वस्थ निरुद्योगी पडून रहावेसें वाटणें हें **आलस्य**, वस्तु एक असतां ती भलतीच वाटणें ही **भ्रांति** व निरुत्साहानें शरीर शिथिल झाल्यामुळें अर्ध्या जाग्रदवस्थेत राहणें हीं **तंद्रा** होय. हे सर्व अत:करणाचे धर्म आहेत. ॥१४॥

- वैराग्यादिकांचीं कार्ये विभागून दाखवितात-

सात्त्विकै: पुण्यनिष्पत्ति: पापोत्पत्तिश्च राजसै: ।
तामसैर्नोभयं किंतु वृथायु:क्षपणं भवेत् ॥१५

अन्वयार्थ - [सात्त्विकै: पुण्यनिष्पत्ति:-] सात्त्विक विकारांच्या योगानें पुण्यसंचय, [राजसै: च पापोत्पत्ति: भवति-] व राजस विकारांच्या योगानें पापाची वृद्धि होते. [तु तमसै: उभयं अपि न भवति-] पण तामस विकारांनीं ह्यांतील कांहींच होत नाहीं, [किंतु वृथा आयु:क्षपणं भवेत्-] तर व्यर्थ आयुष्याचा क्षय मात्र होतो.

प्रकाश:- वैराग्य, क्षमा, औदार्य, अहिंसा, दया इत्यादिक सात्त्विक वृत्तींच्या योगानें पुण्याचा व काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि राजस वृत्तींनीं पापाचा मोठा साठा होतो. आळस, भ्रांति इत्यादि तामस वृत्तींच्या

योगानें पाप किंवा पुण्य यांपैकी एकाचीहि वृद्धि न होतां प्राण्याच्या आयुष्याचा व्यर्थ क्षय होतो. या ठिकाणीं सात्त्विक म्हणजे शास्त्रीय व राजस म्हणजे अशास्त्रीय वृत्ति असा अर्थ करावा. पं. अच्युतराव मोडक लिहितात त्यामुळें ऋतुकालीं स्वभार्यागमन, अध्यापन, प्रवृत्तिमार्गाला उपयुक्त असें देवालयांत गमन, तेथील कीर्तनपुराणादि श्रवण, चैत्रमासांत गंगावातस्पर्शन, ईश्वराच्या रमणीय मूर्तीचें दर्शन, प्रसादाचें सेवन, त्याच्या निर्माल्याचें अवघ्राण (वास घेणें) इत्यादि शास्त्रीय वृत्ति अंत:करणांत असणें हें पाप नव्हे असें सिद्ध होईल. ॥१५॥

-वैराग्यादि या सर्व बुद्धिस्थ वृत्ति असल्यामुळें अन्त:करणादिकांचा स्वामी कोण हें सांगतात-

अत्राहंप्रत्ययी कर्तेत्येवं लोकव्यवस्थिति: ॥१६

अन्वयार्थ- [अत्र अहंप्रत्ययी कर्ता-] या अन्त: करणादिकांवर 'मी' असा अभिमान ठेवणारा जो आत्मा तोच कर्ता स्वामी होय. [हि लोके इति एवं व्यवस्थिति: अस्ति] कारण व्यवहारांत ही अशीच व्यवस्था असते.

प्रकाश:- 'अहं वृत्तिविशिष्ट: आत्मा' -हा मी अशा वृत्तीनें युक्त असलेला आत्मा होय व तोच कर्ता. म्हणजे या सर्वांचा तोच प्रभु (नियामक) आहे. कारण व्यवहारांत सुद्धा एकादें कृत्यं करणाऱ्या पुरुषालाच प्रभु, ईश्वर, धनी, यजमान असें म्हणत असतात, जो बरी वाईट कृत्यें 'मी केलीं' असें म्हणतो, तोच त्याचीं सुखदु:खादि फलें भोगितो, हें युक्तच आहे. कारण व्यवहारांत झालें तरी कोणीहि प्राणी स्वत:च्याच कृत्यांच्या फलाची इच्छा करीत असतो. स्वत: न केलेल्या कृत्यांच्या फलाविषयीं तो कधींच इच्छा करीत नाहीं. तात्पर्य प्राण्यांच्या सुकृत-दुष्कृतजन्य सुखदु:खादि भोगाला हा अहंकारच कारण होत असतो. ही गोष्ट निर्विवाद आहे. ॥१६॥

-याप्रमाणें दुसऱ्या श्लोकाच्या आरंभापासून सोळाव्या श्लोकाच्या अंतापर्यंत जगाची स्थिति सांगून आतां या श्लोकांत तें भौतिक आहे हें जाणण्याचे उपाय सांगतात-

स्पष्टशब्दादियुक्तेषु भौतिकत्वमतिस्फुटम् ।
अक्षादावपि तच्छास्त्रयुक्तिभ्यामवधार्यताम् ॥१७

अन्वयार्थ- [स्पष्टशब्दादियुक्तेषु पदार्थेषु भौतिकत्वं अतिस्फुटं वर्तते-] स्पष्ट शब्दादि गुणांनीं युक्त असलेल्या पदार्थांतील भौतिकत्व अगदीं स्पष्ट आहे. [तत् अक्षादौ अपि शास्त्रयुक्तिभ्यां अवधार्यताम्-] तें इंद्रियादिकांच्या ठिकाणींहि आहे, असा शास्त्र व युक्ति यांच्या योगानें निश्चय करावा.

प्रकाश:- आकाशादि भूतांच्या कार्याला भौतिक म्हणतात. घटादि पदार्थ शब्द, स्पर्श इत्यादि भूतकार्यांनीं युक्त असतात; व त्याचा (भूतधर्मांचा) घटादि पदार्थांच्या ठिकाणीं स्पष्टपणें प्रत्ययहि येतो. त्यामुळे ते भौतिक आहेत असें उघड उघड समजतें. पण श्रोत्रादि बहिरिंद्रियांपासून अहंकारापर्यंत सर्व भौतिकच आहेत हें कसे समजणार ? असा कोणी प्रश्न करील, असे जाणून ह्या श्लोकाच्या दुसऱ्या अर्धांत त्यांचें भौतिकत्व कसें सिद्ध करावें हें सांगतात. मन अन्नाचा विकार आहे; प्राण उदकाचा इत्यादि प्रतिपादन करणाऱ्या छान्दोग्य श्रुतीवरून-हीं श्रोत्रादिक भूतांचीं कार्येच असणें युक्त आहे. कारण भूतांच्या अस्तित्वानें श्रोत्रादिकांचें अस्तित्व असतें व भूतांचा अभाव असतां यांचाहि अभाव होतो. आणि जें ज्याच्या अस्तित्वामुळें असतें किंवा ज्याच्या अभावामुळें नष्ट होतें तें त्याचें कार्य होय-असा न्याय आहे. उदाहरण- मातीच्या घटाचे घट हा पदार्थ मातीच्या अस्तित्वामुळेच उत्पन्न होतो. माती नसती तर कधीच झाला नसता. अशी अन्वयव्यतिरेक व्याप्ति आहे. शिवाय ही श्रोत्रादि, भूतांपासून कशी कशीं उत्पन्न होतात हें पूर्व प्रकरणांत श्रुतिसिद्ध पंचीकरणाने स्पष्टपणें दाखविलें आहे. तसेंच छान्दोग्योपनिषदाच्या सहाव्या अध्यायांत ''अन्नमयंहि सोम्य मन आपोमय:

प्राणस्तेजोमयी वाक्'' (६-५-४) हाच न्याय सोदाहरण दाखविला आहे. सारांश ह्याप्रमाणें श्रुतिरूप शास्त्र व अनुमानरूप युक्ति यांच्या योगानें अहंकारापर्यंत सर्वहि भौतिक आहेत असा दृढ निश्चय करावा. ॥१७॥

-याप्रमाणें भूतें व भौतिक पदार्थ यांचें विवेचन केल्यावर आतां 'सदेव सोम्य इदं अग्र आसीत्' - हे प्रियदर्शन श्वेतकेतो । जगदुत्पत्ती पूर्वी हें सर्व 'तत्'च होतें इत्यादि अद्वितीय ब्रह्मप्रतिपादक श्रुतीचें व्याख्यान करणारे ग्रंथकार त्या वाक्यांतील 'इदं' या पदाचा अर्थ सांगतात-

एकादशेन्द्रियैर्युक्त्या शास्त्रेणाप्यवगम्यते
यावत्किञ्चिद्भवेदेतदिदंशब्दोदितं जगत् ॥१८

अन्वयार्थ- **[एकादशेंद्रियै: युक्त्या शास्त्रेण अपि यावत् किंचित् जगत् अवगम्यते-] मनासह अकरा इंद्रियानीं, अनुमानानें व शास्त्रानेहि जेवढे म्हणून जगत् ज्ञात होतें [तत 'इदं' शब्दोदितं भवेत्-] तें सर्व इदं शब्दानें सांगितलें आहे.**

प्रकाश:- श्रोत्रादि पांच ज्ञानेंद्रियें, वागादि पांच कर्मेद्रिये व मन अशा अकरा इंद्रियांनीं जेवढ्याचे म्हणून ज्ञान होते तें: तसेच अनुमानानें जेवढ्याचा तर्क कारतां येता तें व शास्त्रानें जेवढ्याचा उल्लेख केलेला आहे तें- इत्यादि सर्वांचा पूर्वोक्त श्रुतींत इदंशब्दानें निर्देश केला आहे. इंद्रियांनीं प्रत्यक्ष प्रमाण, युक्तीनें अनुमान, शास्त्रानें शाब्द, व अपिशब्दानें अर्थापत्ति व अनुपलब्धि यांचा येथें उल्लेख केला आहे. **शंका** - श्रोत्रादि पांच ज्ञानेद्रियें व अंत:करण यांच्या योगानें शब्दादिकांचे प्रत्यक्ष ज्ञान होते हें म्हणणें युक्त आहे; पण वागादि कर्मेंद्रियांच्या योगानें एकाद्या पदार्थाचें प्रत्यक्ष ज्ञान झालेले आम्ही कधी पाहिलें किंवा ऐकलेहि नाहीं. **समाधान**-खरें आहे. वागादि कर्मेंद्रियें ज्ञानाला प्रत्यक्ष कारण जरी होत नाहींत तरी शब्दोच्चारादि क्रियांच्या द्वारा त्या त्या इंद्रियांच्या विषयाचे ज्ञान करून देण्यास तीं कारण होतातच. शिवाय कर्मेंद्रियें ज्ञानेंद्रियांना अत्यंत साह्य करणारी आहेत हें सर्वांना माहीत आहे. म्हणून वरील शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं.

-याप्रमाणें 'इदं' शब्दार्थ निश्चित करून पूर्वनिर्दिष्ट श्रुतीचाच अर्थत: अनुवाद करितात-

इदं सर्वंपुरा सृष्टेरेकमेवाद्वितीयकम् ।
सदेवासीन्नामरूपे नास्तामित्यारुणेर्वच: ॥१९

अन्वयार्थ- **[सृष्टे: पुरा-] सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीं [इदं सर्व एकं एव अद्वितीयक आसीत्-] हें सर्व एकच व अद्वितीय होतें. [नामरूपे न आस्ताम् इति छांदोग्य आरुणे: वच: अस्ति-] नामरूप नव्हते, असें छान्दोग्यांत आरुणीचें वचन आहे.**

प्रकाश:- छन्दोग्योपनिषदामध्यें साहाव्या अध्यायांत अरुणपुत्र उद्दालकानें श्वेतकेतु नांवाच्या स्वपुत्राला ब्रह्मोपदेश केला आहे- 'एकमेवाद्वितीयम्'' (६-२-१) तेथें हे सर्व मूर्तामूर्त (साकार व निराकार) सृष्टीच्या उत्पत्तीपूर्वीं केवल सत् (सत्तारूप) होतें. त्यावेळीं त्याचे स्वगत, सजातीय, विजातीय भेद नव्हते, अशा अर्थाची जी श्रुति आहे, तिचाच येथें अर्थत: निर्देश केलेला आहे. इदं म्ह. पूर्वोक्त सर्व दृश्यजात. वच: म्ह० वाक्य ॥१९॥

-लौकिक पदार्थाप्रमाणें ह्या सत्चे स्वगतादि भेद नाहींत, असें 'एकं' व 'एव' 'अद्वितीयं' या तीन पदांनीं सुचविण्याकरिता प्रथम लौकिक पदार्थाचे तीन भेद कसे असतात तें येथें सांगतात-

वृक्षस्य स्वगतो भेद: पत्रपुष्पफलादिभि: ।
वृक्षान्तरात्सजातीयो विजातीय: शिलादित: ॥२०

अन्वयार्थ- [वृक्षस्य पत्र-पुष्प-फलादिभि: स्वगत: भेद: भवति-] वृक्षाचा पानें, फुलें व फळें इत्यादिकांच्या योगाने स्वगत भेद होतो. [तस्य एव वृक्षान्तरात् सजातीय: भेद:-] त्याच्याच अन्य जातींच्या वृक्षांमुळें सजातीय भेद होतो व तथा

शिलादित: विजातीय: भेद:-] तसाच शिला, माती इत्यादि पदार्थांच्या योगानें विजातीय भेद होतो.

प्रकाश:- कोणत्याहि वृक्षाचा पानें, फुलें इत्यादि स्वगत (स्वत:च्या ठिकाणचा) भेद आहे. आम्रादि वृक्षांचा बकुल, बाभुळ इत्यादि वृक्षांशीं सजातीय भेद असतो व वृक्षाचा वृक्षाहून अन्य अशा दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाशीं विजातीय भेद असतो. तात्पर्य प्रत्येक सृष्ट पदार्थांत असे तीन भेद असतात. ॥२०॥

-याप्रमाणें अनात्म पदार्थांच्या ठिकाणचे तीन भेद दाखवून सद्वस्तूमध्येहि प्राप्त होणाऱ्या त्या भेदत्रयाचें श्रुति तीन पदांनीं निवारण करिते, असें सांगतात-

तथा सद्वस्तुनो भेदत्रयं प्राप्तं निवार्यते ।
ऐक्यावधारणाद्वैतप्रतिषेधैस्त्रिभि: क्रमात् ॥२१

अन्वयार्थ- [तथा सद्वस्तुन: प्राप्तं भेदत्रयं-] **त्याचप्रमाणें सद्वस्तुच्या ठिकाणीं प्राप्त होणारे हे तीन भेद** [ऐक्यावधारणाद्वैतप्रतिषेधै: त्रिभि: शब्दै: क्रमात् निवार्यते-] **ऐक्य, निश्चय व द्वैताचा निषेध हे तीन अर्थ सुचविणाऱ्या तीन शब्दांनीं क्रमानें घालविले जातात.**

प्रकाश:- 'एकमेवाद्वितीयम्' यांतील **एकं**-या पदानें ऐक्य व स्वगतभेदशून्यत्व **एव**-या शब्दानें निश्चय व सजातीय भेदराहित्य आणि **अद्वितीयं**-या पदानें दुसऱ्या पदार्थाचा निषेध व विजातीयभेदशून्यत्व हीं सुचविलीं आहेत. श्रुतींतील 'सृष्टीच्यापूर्वीं-यानें कालपरिच्छेद दाखविला जात नाहीं. सिद्धान्तबिन्दूंत काल म्हणजे अविद्याच होय. असें म्हटलें आहे ॥२१॥

-सद्वस्तु निरवयव असल्यामुळें तिच्या ठिकाणीं स्वगतभेदाची नुस्ती कल्पनाहि करवत नाहीं, असें सांगतात-

सतो नावयवा: शंक्यास्तदंशस्यानिरूपणात् ।
नामरूपे न तस्यांशौ तयोरद्याप्यनुद्भवात् ॥२२

अन्वयार्थ - [तदंशस्य अनिरूपणात् सत: अवयवा: न शंक्या:-] **सद्वस्तूच्या अंशाची प्रमाणांनीं सिद्धि होत नसल्यामुळें त्याच्या अवयवांची नुस्ती शंकाहि घेतां येत नाहीं.** [अद्यापि तयो: अनुद्भवात् नामरूपे तस्य अंशौ न-] **प्रलयकालीं नामरूपांचा उद्भवच झालेला नसल्यामुळें नाम व रूप हे त्याचे अंश होऊं शकत नाहींत.**

प्रकाश:- **शंका** - सद्वस्तु एक असल्यामुळें तिच्या ठिकाणीं स्वगतभेद संभवत नाहीं हें म्हणणें अयोग्य आहे. कारण सूर्य जरी एक आहे तरी त्याचा किरणें हा स्वगतभेद आपणाला प्रत्यक्ष दिसतो. तसेंच चंद्राच्या कला व किरणें हा स्वगतभेद सर्वप्रसिद्ध आहे. **समाधान**-सूर्य, चंद्र, इत्यादि उदाहृत पदार्थ वृक्षाप्रमाणेंच सावयव असल्यामुळें त्यांचा स्वगतभेद असणें शक्य आहे. पण हें सद्रूप ब्रह्म वस्तुत: एक ह्या संख्येलाहि पात्र नसल्यामुळें व तें परमार्थत: सर्व मायिक धर्मरहित असल्यामुळें त्याच्या ठिकाणीं स्वगतभेद संभवत नाहीं. सद्रूप तत्त्वाला अंश आहेत असें प्रलयावस्थेंत त्याचें प्रतिपादन करिता येत नसल्यामुळें 'त्याला अवयव आहेत' अशी नुस्ती कल्पनाहि करितां येत नाहीं. **शंका** - प्रत्येक पदार्थाला कांहींतरी नांव व रूप हीं असतातच असा सवाचाहि अनुभव आहे. मग तीं नांवरूपेंच त्या सद्वस्तूचे अंश कां होणार नाहींत ? **समाधान** - प्रलयकालीं सर्वहि चराचर पदार्थांचा लय होत असल्यामुळें त्या अवस्थेचा नामनिर्देश करणारा व रूप पाहणारा कोणीच रहात नाहीं हें उघड आहे. मग नांव व रूप हे त्याचे अंश कसें होणार. बाबारे वाद्या, नाम, रूप इत्यादि सर्वहि भाव द्रव्यरूप सृष्टीच्या उत्पत्तीनंतर उत्पन्न होतात. भगवानांनीं 'ममैवांशो०' या वाक्यांत सुद्धां 'जीवलोके' म्ह० ह्या प्राण्यांच्या सृष्टींत माझा सनातन अंश जीवरूप होतो असें म्हटलें आहे. ''अनेन जीवेनात्मनाऽनुप्रविश्य नामरूपे व्याकरवाणि'' ही श्रुतिहि उत्पत्तीनंतर म्ह० जीवरूपानें आत्मा प्रविष्ट झाल्यावर नाम व रूप उत्पन्न होतात असें म्हणते. तस्मात् सृष्ट्युत्पत्तीच्या पूर्वीं

नामरूपांचा संभव नाहीं. तात्पर्य सद्वस्तूच्या ठिकाणीं स्वगतादिभेद नसतात ही गोष्ट सिद्ध झाली. ॥२२॥

-'प्रलयसमयीं नाम-रूपांचा अभाव कां असतो ?' उत्तर-

नामरूपोद्भवस्यैव सृष्टित्वात्सृष्टित: पुरा ।
न तयोरुद्भवस्तस्मान्निरंशं सद्यथा वियत् ॥२३

अन्वयार्थ-[नामरूपोद्भवस्य एव सृष्टित्वात्-] नांव व रूप यांच्या उत्पत्तीलाच सृष्टित्व असल्यामुळे म्ह० नामरूपांची उत्पत्ति हीच सृष्टि असल्यामुळें [सृष्टित: पुरा तयो: उद्भव: नास्ति-] सृष्टीच्या पूर्वी नामरूपांचा उद्भव होत नाहीं. [तस्मात् यथा वियत् तथा सत् निरंशं अस्ति-] तस्मात् आकाशाप्रमाणें सत् निरंश आहे.

प्रकाश:-नैयायिकादि तार्किकांच्या समजुतीकरितां याविषयीं आम्हांला अनुमानहि करितां येतें-तें असें-ही सद्वस्तु स्वगतभेदरहित असणेंच युक्त आहे. कारण ती अवयवशून्य आहे. जो जो पदार्थ निरवयव असतो तो तो स्वगतभेदशून्य असतो. उदाहरण आकाशाचें. आकाश निरवयव असल्यामुळें त्याचा वृक्षाच्या पानादिकांप्रमाणें स्वगतभेदहि कोठें दिसत नाहीं. तात्पर्य सद्वस्तु स्वगतभेदशून्य आहे ही गोष्ट सिद्ध झाली. ॥२३॥

-आतां या श्लोकांत पूर्वोक्त श्रुतींतील 'एव-' पदानें सजातीय भेदाचें निरसन होतें असें दाखवितात-

सदन्तरं सजातीयं न वैलक्षण्यवर्जनात् ।
नामरूपोपाधिभेदं विना नैव सतो भिदा ॥२४

अन्वयार्थ- [वैलक्षण्यवर्जनात्-] सद्वस्तूच्या ठिकाणीं विलक्षणता नसल्यामुळें [सदन्तरं सजातीयं न अस्ति-] सत्-हून पृथक् असें त्याच्या जातीचें कांहींएक नाहीं. [नामरूपोपादिभेदं विना सत: भिदा न एव अस्ति-] कारण नाम व रूप या उपाधींच्या भेदावांचून सद्वस्तूचा भेद कधींच होत नाहीं.

प्रकाश:- दोन पदार्थ असल्यावांचून त्यांच्यामध्यें विलक्षणता भेद येत नाहीं. सृष्टीपूर्वी केवळ सद्वस्तुच असल्यामुळें तिच्यामध्यें विलक्षणता नसते हें उघडच आहे. त्यामुळें ''पार्थ एव धनुर्धर:'' ह्या उदाहरणाप्रमाणें सताचा सजातीय भेदहि होत नाहीं. **शंका**- सत् म्हणजे सत्ता असाच अर्थ जर तुम्ही करीत असाल तर हें तुमचें म्हणणें योग्य नाहीं. कारण घटाची सत्ता, वस्त्राची सत्ता, काष्ठाची सत्ता असा सत्तेंत सजातीय भेद नेहमीं व्यवहारांत दिसतो ! **समाधान**- हा भेद खरा नसून घटादि उपाधीमुळें भासणारा आहे. कारण तो खरा असता तर नित्य राहिला असता. पण तसा रहात नाहीं. घट किंवा वस्त्र यांचा नाश झाल्यानें त्या त्या भेदाचा नाश होतो. पण सत्तेचा कधीं नाश होत नाहीं. सारांश उपाधीवांचून सद्वस्तूंत भिन्नता उत्पन्न होणें युक्त नाहीं; आणि उपाधिकृत भिन्नता खरी नसते असा न्याय व अनुभवहि आहे. म्हणून सद्वस्तूचा परमार्थत: सजातीय भेद नाहीं. ॥२४॥

-त्याचा विजातीय भेदहि होत नाहीं, कसा तो पहा-

विजातीयमसत्तत्तु न खल्वस्तीति गम्यते ।
नास्यात: प्रतियोगित्वं विजातीयाद्भिदा कुत: ॥२५

अन्वयार्थ- [विजातीयं सत् असत् तत् तु अस्ति इति न खलु गम्यते-] सत्चें विजातीय जें असत् तें तर 'असतें-आहे' असें कधींच वाटत नाहीं. [अत: अस्य प्रतियोगित्वं न अस्ति-] म्हणून हें असत् सत्चें प्रतियोगीहि होत नाहीं. [तत: विजातीयात् भिदा कुत: स्यात्-] मग विजातीयामुळें सत्चा भेद कोठून होणार ?

प्रकाश:- सत्च्या विरुद्ध म्हणजे सत्हून भिन्न जातीचें एक असत् हेंच आहे. पण तें शून्यरूप असल्यामुळें तें 'आहे' असें म्हणतांहि येत नाहीं. मग

शून्य विद्यमान पदार्थाचें विरोधि होईल हें नांव कशाला पाहिजे ? कारण शून्यरूप वांझेचा पुत्र देवदत्त नांवाच्या मनुष्याशीं कधीं तरी लढूं शकेल काय ? तात्पर्य सत् व असत् यांच्यामध्यें प्रतियोगिभाव नसल्यामुळें तीं परस्पर विजातीय होत नाहींत. ॥२५॥

-या सर्व विचारापासून निष्पन्न काय झालें तें सांगतात-

एकमेवाद्वितीयं सत्सिद्धमत्र तु केचन ।
विव्हला असदेवेदं पुरासीदित्यवर्णयन् ॥२६

अन्वयार्थ- **[एवं सत् एकमेवाद्वितीयं सिद्धं-] याप्रमाणें सत् स्वगत, सजातीय व विजातीय या त्रिविध भेदानें रहित आहे असें सिद्ध झालें. [अत्र तु केचन विव्हला: इदं पुरा असत् एव आसीत् इति अवर्णयन्-] पण असें असतांनाहि कांहीं तार्किकांनीं विव्हल होऊन 'हें पूर्वीं असत्च होतें' असें वर्णन केलें आहे.**

प्रकाश:- श्लोकार्थ स्पष्ट आहे. यास्तव कांहीं पदांचें मात्र व्याख्यान करितों. तत्र तु-श्रुति, युक्ति व अनुभव या तीन प्रबल प्रमाणांनीं सद्वस्तु त्रिविध भेदशून्य आहे असें सिद्ध झालें असतां सुद्धा; 'तद्धैक आहुरसदेवेदमग्र आसीत्-' ही श्रुति पुढें करून केचन-बौद्धमतानुयायी माध्यमिक नांवाचे 'सर्वं शून्यं शून्यं' असें प्रतिपादन करणारे कांहीं वादी विव्हला:- सर्व प्रमाणांचें भूषण व अनुभवरूप अशा वेदान्त वाक्यांचा अव्हेर असल्यामुळें ज्यांची बुद्धि निराधार होऊन व्याकुळ झाली आहे असे लोक, सृष्ट्युत्पत्तीच्या पूर्वीं हें आतां विद्यमानरूपानें प्रत्ययाला येणारें जगत् शून्य होतें असें वर्णन करूं लागले. ॥२६॥

-ते शून्यवादी कसे विह्वल झाले याविषयीं एक दृष्टान्त देतात-

मग्नस्याब्धौ यथाऽक्षाणि विव्हलानि तथास्य धी:।
अखण्डैकरसं श्रुत्वा निष्प्रचारा बिभेत्यत: ॥२७

अन्वयार्थ- **[अब्धौ मग्नस्य यथा अक्षाणि विव्हलानि भवन्ति-] समुद्रांत बुडालेल्या प्राण्यांची इंद्रियें जशीं विव्हल होतात, [तथा अस्य धी: अखंडैकरसं श्रुत्वा निष्प्रचारा सति अत: बिभेति-] त्याप्रमाणें ह्या माध्यमिकाची बुद्धि ब्रह्म अखंड व एकरस आहे असें ऐकून कुंठित होते व तिला या वस्तूची मोठी भीति वाटते.**

प्रकाश:- या ठिकाणीं माध्यमिक ह्या शब्दाचा लक्षणेनें अर्थ करावा. कारण सर्व शून्यवादी, सर्व द्वैती व सर्व अवैदिक धर्मी ह्या अखंड व एकरस ब्रह्माला भितात असा सर्वत्र अनुभव आहे. तथापि माध्यमिक हे शून्यवादी असल्यामुळें त्यांचा येथें स्पष्टपणें निर्देश केला आहे. ॥२७॥

-'सर्व वाद्यांना ह्या आमच्या श्रुतिवाक्याचें भय वाटतें असें केवल मीच म्हणतों असें नाहीं, तर श्रीमत् गौडपादाचार्यादि सर्व आचार्यहि हीच गोष्ट सांगत आहेत,' असें श्रीस्वामी येथें सांगतात-

गौडाचार्या निर्विकल्पे समाधावन्ययोगिनाम् ।
साकारब्रह्मनिष्ठानामत्यन्तं भयमूचिरे ॥२८

अन्वयार्थ- **[गौडाचार्य: निर्विकल्पे समाधौ-] गौडपादाचार्यांनीं ह्या निर्विकल्प समाधीचें, [साकार-ब्रह्मनिष्ठानां अन्ययोगिनां-] साकारब्रह्माच्या ठिकाणीं निष्ठा ठेवून राहणाऱ्या दुसऱ्या उपासकांना [अत्यन्तं भयं ऊचिरे-] मोठें भय वाटतें असें सांगितलें आहे.**

प्रकाश:- गौडपादाचार्य हे जगद्गुरु श्रीमच्छंकराचार्यांच्या गुरूंचे गुरु होत. पण कांहीं युरोपीयन पंडितांनीं व आंधळेपणानें त्यांना अनुसरणाऱ्या भरतखंडांतील कांहीं प्राध्यापकांनीं गौडपादांना बौद्ध ठरविण्याचा हास्यास्पद प्रयत्न केला. त्याचें खंडन 'अद्वैत-सिद्धान्त-दर्शन' या माझ्या ग्रंथांत पहावें. त्यांनीं, ईश्वर साकार आहे असा निश्चय करून त्याचविषयीं आग्रह धरून बसणाऱ्या वाद्यांना, अद्वैत साक्षात्काराचें एकाद्या वाघासारखें मोठें भय वाटतें असें सांगितलें आहे. ॥२८॥

-गौडपादाचार्यांनीं मांडूक्योपनिषदाचा अर्थ स्पष्ट

करण्याकरितां २०० कारिका केल्या आहेत. त्यांतील पूर्वोक्त अर्थाची कारिका येथें घेतात-

अस्पर्शयोगो नामैष दुर्दर्शः सर्वयोगिभिः ।
योगिनो बिभ्यति ह्यस्मादभये भयदर्शिनः ॥२९

अन्वयार्थ- [यः अस्पर्शयोगः नाम योगः एषः सर्वयोगिभिः दुर्दर्शः-] जी 'अस्पर्शयोग' नांवाची ही निर्विकल्प समाधि ती साकार मूर्तींचें ध्यान करणाऱ्या सर्व योग्यांना दुष्प्राप्यच आहे. [हि अभये भयदर्शिनः योगिनः अस्मात् बिभ्यति-] कारण भयरहित अशा ठिकाणीं भय मानणाऱ्या त्यांना ह्या समाधीचें भय वाटतें.

प्रकाशः- अस्पर्शयोगः- ज्या ठिकाणीं बुद्धीच्या विषयतेचा संबंध नसतो म्हणजे जो बुद्धीला विषय होत नाहीं असा आत्मा. अच्युतरायांनीं त्याचा अर्थ निर्विकल्पक समाधि असा केला आहे. निर्जन प्रदेशांत लहान मुलांना जशी निष्कारण भीति वाटते त्याप्रमाणें काल्पनिक भीतीनें योग्यांना भय वाटतें. ॥२९॥

-आचार्यांनीहि असेंच म्हटलें आहे, असें सांगतात-

भगवत्पूज्यपादाश्च शुष्कतर्कपटूनमून् ।
आहुर्माध्यमिकान् भ्रान्तानचिन्त्येऽस्मिन्सदात्मनि ॥३०

अन्वयार्थ- [च भगवत्पूज्यपादाः-] आणि तसेच भगवत्पूज्यपादहि [अमून् शुष्कतर्कपटून् माध्यमिकान्-] या शुष्क तर्क करण्यांत अतिशय पटुचतुर असलेल्या माध्यमिकांना [अस्मिन् अचिन्त्ये सदात्मनि-] या अचिंत्य सद्रूप आत्म्याविषयीं [भ्रान्तान् आहुः-] भ्रान्त झालेले असें म्हणाले आहेत.

प्रकाशः- शुष्कतर्कपटून्-आप्तादिकांचा अवमान करून मन मानेल तसे निरर्थक तर्क करणाऱ्या नास्तिकांना ॥३०॥

-आचार्याचें मूळ वार्तिकच येथें देतात-

अनादृत्य श्रुतिं मौर्ख्यादिमे बौद्धास्तमस्विनः ।
आपेदिरे निरात्मत्वमनुमानैकचक्षुषः ॥३१

अन्वयार्थ- [इमे तमस्विनः बौद्धाः-] हे अज्ञानी बौद्ध [मौर्ख्यात् श्रुतिं अनादृत्य-] केवल मूर्खपणानें श्रुतीचा अनादर करून [अनुमानैकचक्षुषः सन्तः-] केवल अनुमानप्रमाणवादी होतात [निरात्मत्वं आपेदिरे-] व शून्यवादास प्राप्त होतात.

प्रकाशः- बौद्ध वेदांना अप्रमाण मानितात. त्यांना मुख्यतः अनुमान प्रमाण मान्य आहे. पण प्राण्याचा केवळ अनुमानानेंच जगांतील व्यवहार होत नसल्यामुळें पुष्कळ वेळ त्याला आप्तवाक्याचाहि आश्रय करावा लागतो. परंतु ही अनुभवसिद्ध गोष्ट स्वमताचा आग्रह धरून बसणाऱ्या बौद्धांना मान्य होत नसल्यामुळें त्यांना हे वेदान्ती तुच्छ मानितात. ॥३१॥

-या श्लोकांत शून्यवादी बौद्धाला प्रश्न विचारून निरुत्तर करितात-

शून्यमासीदिति ब्रूषे सद्योगं वा सदात्मताम् ।
शून्यस्य न तु तद्युक्तमुभयं व्याहतत्वतः ॥३२

अन्वयार्थ- [रे माध्यमिक 'शून्यं आसीत्' इति वाक्येन-] अरे माध्यमिका ! 'शून्य होतें' ह्या वाक्यानें [सद्योगं वा सदात्मतां वा ब्रूषे-] तूं शून्याचा सत्तारूप जातीशीं संबंध सांगतोस कीं त्याचें सत्तारूपत्व सांगतोस ? [व्याहतत्वतः तत्तु उभयं अपि शून्यस्य न युक्तम्-] पण बाबारे ! व्याघात हा दोष येत असल्यामुळें शून्याच्या ठिकाणीं हे दोन्ही पक्ष संभवत नाहींत.

प्रकाशः- 'शून्य होतें' हें वाक्य आहे. त्यांतील होतें (आसीत्) या क्रियेंतील अस् या धातूचा असणें असा केवळ अस्तित्व दाखविणारा सत्तावाचक अर्थ आहे. पण शून्य म्ह० 'कांहीं नाहीं' होतें- हें म्हणणें- माझी माता वन्ध्या-ह्या म्हणण्याप्रमाणें-वदतो व्याघातानें युक्त आहे. कारण जें कांहीं नाहीं तें असेल

कसें ? तात्पर्य सत्ता व असत्ता यांचा संबंध त्रिकालींहि होणें शक्य नाहीं. बरें शून्य सत्तारूप आहे असें म्हणावें तरीहि वरील दोष येणारच. कारण शून्य जर सत्तारूप झालें तर त्याच्या शून्यत्वाचाच नाश होणार. सारांश कसाहि विचार केला तरी 'शून्यं आसीत्' हें वाक्य युक्तिशून्य आहे असेंच सिद्ध होतें. ॥३२॥

-पूर्वोक्त वाक्यावर व्याघात दोष कसा येतो तेंच ग्रंथकार दृष्टान्तानें दाखवितात-

न युक्तस्तमसा सूर्यो नापि चासौ तमोमय: ।
सच्छून्ययोर्विरोधित्वाच्छून्यमासीत्कथं वद ॥३३

अन्वयार्थ- [सूर्य: तमसा युक्त: न भवति-] सूर्य अंधकारानें युक्त होत नाहीं. [असौ तमोमय अपि च न अस्ति-] तसाच हा तमोरूपहि नसतो. [सच्छून्ययो: विरोधित्वात् शून्यं आसीत् इति कथं वद-] मग सत् व शून्य यांचा सूर्य व अंधकार यांप्रमाणेंच विरोध असल्यामुळें 'शून्य होतें' असें कसें म्हणतोस ? बोल.

प्रकाश:- सूर्य व अंधकार यांचा परस्पर विरोध असल्यामुळें त्यांचा संबंध होणें किंवा तदापत्ती-तद्रूपता होणें जसें अत्यंत अशक्य आहे, त्याचप्रमाणें सत् व शून्य यांचा संयोग किंवा तादात्म्य होणें अशक्य आहे असें या श्लोकाचें तात्पर्य आहे. ॥३३॥

'-असें जर आहे तर निर्विकल्प ब्रह्मामध्यें आकाशादिकांचें अस्तित्व तुम्ही कसें मानतां ? त्यावर व्याघात दोष नाहीं का येत ?' उत्तर-

वियदादेर्नामरूपे मायया सुविकल्पिते ।
शून्यस्य नामरूपे च तथा चेज्जीव्यतां चिरम् ॥३४

अन्वयार्थ- [वियदादे: नाम-रूपे मायया सुविकल्पिते-] आकाशादिकांचें नाम-रूप मायेनें कल्पित आहे. [शून्यस्य नाम-रूपे च तथा इति चेत्-] शून्याचें नांव-रूपहि जर तसेंच कल्पित असेल तर [चिरं जीव्यताम्-] तें तुमचें शून्य चिरकाल जिवंत राहो.

प्रकाश:- शून्याचें नांव रूप इत्यादि जर कल्पित असेल तर आम्ही तुमचा निषेध करणार नाहीं व विरोधहि दाखविणार नाहीं कारण कल्पित वस्तूच्या योगानें अधिष्ठानाला कोणताहि दोष लागत नाहीं. तात्पर्य कल्पितत्त्व स्वीकारल्यानें तुमचा अपसिद्धान्त होऊन आमच्या मताचाच तुम्ही स्वीकार केल्यासारखें होत असल्यामुळें ती गोष्ट आम्हांला इष्ट आहे. ॥३४॥

-'तर मग शून्याच्या नाम-रूपाप्रमाणें सद्वस्तूचें नाम-रूपहि कल्पितच आहे असें मानणें भाग आहे. कारण तुमच्या मतीं वास्तविक नाम-रूपांअभाव आहे' अशी शंका-

सतोऽपि नामरूपे द्वे कल्पिते चेत्तदा वद ।
कुत्रेति निरधिष्ठानो न भ्रम: क्वचिदीक्ष्यते ॥३५

अन्वयार्थ- [सत: अपि नामरूपे द्वे कल्पिते-] सद्वस्तूचेंहि नाम व रूप हीं दोन्हीं कल्पित आहेत [इति चेत् तदा कुत्र इति वद-] असें जर म्हणशील तर तीं कोणत्या अधिष्ठानावर कल्पित आहेत, तें सांग. [यत: निरधिष्ठान: भ्रम: न क्वचित् ईक्ष्यते-] कारण अधिष्ठानावांचून भ्रम झालेला कधींच कोठें दिसत नाहीं.

प्रकाश:- रामकृष्णटीकेंत असें लिहिलें आहे. - हा तुमचा प्रश्नच अयोग्य आहे. कारण आम्ही तुला पुन: असा प्रश्न करितों कीं, ही सत्चीं नामरूपें सत् वस्तूवर कल्पित मानावयाचीं कीं असत् वस्तूवर किंवा जगावर ? सत् वस्तूवर कल्पित म्हणशील तर तसें बोलूं सुद्धां नकोस. कारण रजतादि अन्य नामादिकांची शुक्ति इत्यादि अन्य पदार्थांवर कल्पना होत असते. तेव्हां सत्चीच सत्वर कल्पना कशी होईल ? बरें असत् वस्तूवर सत् इत्यादि नामरूपांची कल्पना करा असें म्हणशील तरी तेंहि अयोग्यच. कारण असत् म्हणजे कांहीं नाहीं. तेव्हां तें कल्पनेला अधिष्ठान कसें होणार बरें ? सद्वस्तूपासून उत्पन्न झालेल्या जगावर त्याच्या

(सद्वस्तूच्या) नामरूपाची कल्पना करावी असें सांगूं लागशील तर तें अशक्य आहे. कारण, कारणाचें अधिष्ठान कार्य असतें हें म्हणणें कोणीहि मान्य करणार नाहीं. **शंका** - अहो पण तुम्हाला ही एवढी पंचाईत जर अधिष्ठानाकरितांच पडत असेल तर त्या अधिष्ठानालाच सोडा म्हणजे झालें. कल्पनेला अधिष्ठान पाहिजेच असा कोठें नियम आहे ? **समाधान** - अधिष्ठानावांचून कधींच कल्पना होत नाहीं. अंधारांत सर्प भासावयास रज्जु लागते. रुप्याची कल्पना होण्यास चकचकणारा पांढरा पदार्थ पाहिजे. पिशाच्च्याचा भास होण्यास स्तंभादि कांहींतरी पाहिजे, असा सर्वत्र नियम आहे. ॥३५॥

'-शून्य होतें' ह्या आमच्या म्हणण्यावर जसा तुम्ही व्याघात हा दोष आणलात, तसाच 'सत् होतें' ह्या तुमच्या म्हणण्यावरहि दोष येतो, अशी शंका-

सदासीदिति शब्दार्थभेदे वैगुण्यमापतेत् ।
अभेदे पुनरुक्तिः स्यान्मैवं लोके तथेक्षणात् ॥३६

अन्वयार्थ- ['सत् आसीत्' इति शब्दार्थभेदे सति वैगुण्यं आपतेत्-] 'सत् होतें' ह्या दोन शब्दांचा निरनिराळा अर्थ आहे कीं एकच ? निरनिराळा असेल तर वैगुण्य येतें. अद्वैताची हानि होतें. [अभेदे तु पुनरुक्तिः स्यात्-] व एकच अर्थ असेल तर पुनरुक्ति हा दोष येतो. उत्तर- [लोके तथा ईक्षणात् एवं मा भण-] व्यवहारांत सर्वत्र अशीं वाक्यें बोलत असल्यामुळें असें भलतेंच म्हणू नकोस.

प्रकाशः- ह्या श्लोकांत प्रश्न व उत्तर हीं दोन्हीं आहेत. 'सत् होतें' याचा अर्थ सत्ता होती असा आहे. पण हें तुमचें म्हणणें सुद्धां दोषयुक्त आहेच. कारण सत्तेचें म्ह० अस्तित्वाचें अस्तित्व सांगण्यांत कांहीं एक तात्पर्य नसतें. यास्तव तुम्हाला आम्ही असा प्रश्न करितों कीं सत्ता होती- या वाक्यांतील प्रत्येक शब्दाचा अर्थ पृथक् आहे कीं दोन्हीं शब्दांचा मिळून एक अर्थ आहे ? पृथक्-भिन्न अर्थ असेल तर दोन सत्तेचा बोध होत असल्यामुळें तुमच्या अद्वैताची हानि झाली. आणि एकच अर्थ असेल तर सत्तेचा या शब्दाचीच होती या शब्दांत पुनः आवृत्ति होत असल्यामुळें पुनरुक्ति हा दोष आलाच. तेव्हां आतां या आमच्या अभेद्य शंकेचें कसें तें समाधान करा. **समाधान**- व्यवहारांत असे अनेक प्रयोग होत असतात. उगीच भलतीच शंका घेऊ नये. ॥३६॥

-अशा प्रयोगाचींच उदाहरणें-

कर्तव्यं कुरुते वाक्यं ब्रूते धार्यस्य धारणम् ।
इत्यादि वासनाविष्टं प्रत्यासीत्सदितीरणम् ॥३७

अन्वयार्थ- [कर्तव्यं कुरुते-] कर्तव्य करितो, [वाक्यं ब्रूते-] वाक्य बोलतो, [धार्यस्य धारणम्-] धारण करण्यास योग्य अशा वस्तूचें धारण करणें, [इत्यादि वासनाविष्टं प्रति सत् आसीत् इति ईरणम्-] इत्यादि वाक्यांचा ज्याला संस्कार झाला आहे त्या श्वेतकेतूला उद्देशून 'सत् आसीत्' असें म्हटलें आहे.

प्रकाशः- रामा आपलें कर्तव्य करितो, तो बोलणें बोलतो, इत्यादि शेंकडों प्रयोग व्यवहारांत होतात. 'सत् आसीत्' हें वाक्य श्वेतकेतूला उद्देशून आहे. ज्याच्याशीं भाषण करावयाचें असतें त्याला समजेल अशा भाषेंत बोलल्यावांचून व्यवहार होत नाहीं. म्हणून वर दाखविलेल्या वाक्यांची ज्याला संवय झाली आहे अशा अरुणपुत्राकरितां तें वाक्य योजिलें असल्यामुळें त्यावर पूर्वोक्त दोष येत नाहीत. ॥३७॥

-'अहो, पण अद्वितीय वस्तूमध्यें भूतकालाचाहि अभाव आहे. तेव्हां 'अग्रे' उत्पत्तीपूर्वी असें कसें म्हटलें आहे ?' उत्तर -

कालाभावे पुरेत्युक्तिः कालवासनया युतम् ।
शिष्यं प्रत्येव तेनात्र द्वितीयं न हि शक्यते ॥३८

अन्वयार्थ- [कालाभावे पुरा इति उक्तिः कालवासनया युतं शिष्यं प्रति एव अस्ति-] प्रलयावस्थेंत काल नसतांनाहि 'सृष्ट्युत्पत्तीपूर्वी' असें जें म्हटलें आहे तें कालाच्या वासनेनें युक्त

असलेल्या शिष्याला उद्देशूनच आहे. [तेन इह द्वितीयं न हि शक्यते-] म्हणून त्यावेळीं द्वैताच्या अस्तित्वाविषयीं शंका घेतां येत नाहीं.

प्रकाश:- पूर्व श्लोकांत सांगितल्याप्रमाणें 'पूर्वी' हें कालवाचक विशेषण सुद्धां श्वेतकेतूकरितां आहे. यास्तव 'कालाच्या अस्तित्वामुळें अद्वैताची हानि होते' अशी शंका घेतां येत नाहीं. जगदुत्पत्तीपूर्वीं जगाचा अभाव असतो. त्यामुळें तो अभाव व सद्वस्तु असे द्वैत असतें हें म्हणणेंहि शोभत नाहीं. कारण अभाव शून्यरूप असल्यामुळें त्याच्या योगानें अद्वैताची हानि ह ा
नाहीं. ॥३८॥

-आतां अद्वैतसिद्धान्ताचें रहस्य सांगतात-

चोद्यं वा परिहारो वा क्रियतां द्वैतभाषया ।
अद्वैतभाषया चोद्यं नास्ति नापि तदुत्तरम् ॥३९

अन्वयार्थ- [चोद्यं वा परिहारो वा द्वैतभाषया क्रियताम्-] अद्वैतसिद्धान्ताविषयीं शंका घेणें किंवा तिचें समाधान करणें हीं दोन्हीं द्वैत भाषेनें करावीं. [अद्वैतभाषया चोद्यं नास्ति-] कारण अद्वैत भाषेनें प्रश्न करितां येत नाहीं, [तदुत्तरं अपि नास्ति-] व त्याचें उत्तरहि देतां येत नाहीं.

प्रकाश:- आत्मतत्त्व अवाङ्मनसगोचर (वाणी व मन यांना विषय न होणारें) असल्यामुळें लौकिक भाषेचा आश्रय केल्यावांचून त्याविषयीं प्रश्न करितां येत नाहीं, व उत्तरहि देतां येत नाहीं. यास्तव प्रश्नोत्तरकालीं गुरुशिष्यांना लौकिक भाषेचाच अंगीकार करावा लागतो. आत्मसाक्षात्काराचा उल्लेख करणें अशक्य असल्यामुळें अद्वैतानुभवकालीं प्रश्न व उत्तर यांतील एकहि गोष्ट संभवत नाहीं. एवढ्या करितांच वेदांतामध्यें त्या नित्यशुद्धबद्ध परमात्म्याचा लक्षणावृत्तीनें बोध केलेला आहे. तसेंच व्यवहारदशेंतच शंका-समाधानादि करावें लागतें. परमार्थावस्थेंत प्रश्न आणि उत्तर संभवत नाहीं, हें पक्कें लक्षांत ठेवावे.

- 'वस्तुत: द्वैताचा अभावच आहे' याविषयीं स्मृतीचें प्रमाण देतात-

तदा स्तिमितगम्भीरं न तेजो न तमस्ततम् ।
अनाख्यमनभिव्यक्तं सत्किञ्चिदवशिष्यते ॥४०

अन्वयार्थ- [तदा स्तिमितगंभीरं-] प्रलयकालीं निश्चल व गंभीर-मनानें चिंतन करण्यास अशक्य [न तेज: न तम:-] प्रकाशहि नव्हे व अंधकारहि नव्हे, [ततं अनाख्यं अनभिव्यक्तं-] सर्वव्यापी, बोलतां न येण्यासारखें व चक्षु:श्रोत्रादिकांचाहि विषय न होणारें [एवंविधं किंचित् सत् अवशिष्यते-] असें कांहीं सत्तारूप अवशिष्ट राहतें.

प्रकाश:- हें बृहद्योगवासिष्ठांचें वचन आहे. त्यांनीं रामाला या कारिकेंत प्रलयकालच्या अवस्थेचा बोध केला आहे. त्यावेळीं काय असतें हें शब्दांनीं सांगतां येत नाहीं. तो प्रकाश म्हणावा तर प्रकाशधर्मरहित व तम म्हणावें तर तेंही नव्हे. असें कांहीं अनिर्वाच्य पण सद्रूप (विद्यमान, अस्तित्वरूप) असतें. ह्यावरून जगदुत्पत्तीच्या पूर्वीं निश्चल व मनानें चिंतन न करितां येण्याजोगें, जें तेजाचें अधिकरण नव्हे, व तमाहून विलक्षण अतींन्द्रिय असें सत् म्ह० शून्याहून विलक्षण तत्त्व अस्तित्वांत होतें. तें सत् द्वैतनिषेधाच्या अधिष्ठानरूपानें अवशिष्ट राहतें. ॥४०॥

-भूयमदि चार भूतें उत्पन्न होणारीं असल्यामुळें अनित्य आहेत हें म्हणणें सयुक्तिक आहे. पण आकाश नित्य व विभु असल्यामुळें तें अनित्य कसें मानितां येईल ? अशी शंका -

ननु भूम्यादिकं मा भूत्परमाण्वन्तनाशत: ।
कथं ते वियतोऽसत्त्वं बुद्धिमारोहतीति चेत् ॥४१

अन्वयार्थ- [ननु भूम्यादिकं परमाण्वन्तनाशत: मा भूत्-] भूमि, उदक, तेज व वायु या चार द्रव्यांचा परमाणूपर्यंत नाश होत असल्यामुळें तीं मिथ्या असोत. [तथापि वियत: असत्त्वं ते बुद्धिं कथं

आरोहति इति चेत्-] पण आकाशाचें मिथ्यात्व तुमच्या बुद्धीवर आरूढ कसें होतें म्हणून जर म्हणशील तर ऐक.

प्रकाश:- शून्यवादी बौद्धाचें मत खोडून टाकिलें असतां आतां येथें तार्किकांनीं शंका घेतली आहे. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पांच भूतें आहेत. ज्याच्या गुणाचें बहिरिंद्रियानें ग्रहण होतें तें भूत अशी ते भूत शब्दाची व्याख्या करितात. पृथिव्यादि द्रव्यांचे गंधादि-हे क्रमानें गुण असून त्यांचें घ्राणादि इंद्रियांच्या योगानें ग्रहण होतें. म्हणून पृथ्वीपासून आकाशापर्यंत जीं पांच द्रव्यें त्यांनीं मानिलेलीं आहेत तीं भूतेंहि आहेत असें ते म्हणतात. स्थूल पृथ्वी इत्यादि भूतें परमाणूपासून द्व्यणुकादि क्रमानें होतात व ईश्वरेच्छेनें प्रलयकालीं उलट क्रमानें त्यांचा परमाणूपर्यंत नाश होतो. त्यामुळें पृथ्व्यादि चार भूतें अनित्य आहेत असें जर कोणी म्हटलें तर तें एक आम्ही क्षणभर मानूं. पण विभु, एक व नित्य (पृथ्वीप्रमाणें परमाणूपासून न झालेलें) असें जें आकाश तेंहि अनित्य हें तुमचें म्हणणें मात्र आम्हांला (नैयायिकांना) मोठ्या धाडसाचें वाटतें. अथवा प्रत्यक्षादि हजारों प्रमाणांनीं आकाश विनाशशून्य आहे असें सिद्ध होत असतां केवळ श्रुतिस्मृतीवर श्रद्धा ठेविल्यानें जड झालेली तुझी बुद्धि अंधासारखी विचारहीन झाली तर त्यांत नवल तें कोणचें ? पण अरे भल्या माणसा, आकाशाचें असत्त्व तुझ्या बुद्धीला पटतें तरी कसें ?

समाधान- आमच्याविषयीं एवढें आश्चर्य मानून तूं जो प्रश्न आम्हांला करीत आहेस तोच तूं स्वत:ला करून पहा. म्हणजे तुझें तुलाच उत्तर मिळेल. ॥४१॥

-वरील आक्षेपाचा दृष्टान्तानें परिहार करितात-

अत्यन्तं निर्जगद्व्योम यथा ते बुद्धिमाश्रितम् ।
तथैव सन्निराकाशं कुतो नाश्रयते मतिम् ॥४२

अन्वयार्थ- [यथा अत्यन्तं निर्जगद्व्योम ते बुद्धिं आश्रितं-] सर्व जगाचा नाश झाल्यावर राहणाऱ्या आकाशाचें ग्रहण तुझी बुद्धि जसें करिते, [तथा एव निराकाशं सत् ते बुद्धिं कुत: नाश्रयते-] तसेंच आकाशरहित 'सत्-' वस्तूचे ती कां बरें ग्रहण करणार नाहीं ?

प्रकाश:- ज्या तुझ्या कुशाग्र बुद्धीला सर्व सृष्टीचा नाश झाल्यानंतरहि आकाशाचें ज्ञान होतें, तिलाच आकाशाच्या लयनांतर अवशिष्ट राहणाऱ्या सद्रूप परमात्मवस्तूचें ज्ञान होऊं नये हें तरी आश्चर्य नव्हे काय ॥४२॥

-'अहोपण एखादी गोष्ट प्रत्यक्ष दिसल्यावर ती नाहीं, ती संभवत नाहीं. असें म्हणता येत नाहीं,' या न्यायाचा आश्रय करून तार्किकाचा आक्षेप व त्याचा परिहार-

निर्जगद्व्योम दृष्टं चेत्प्रकाशतमसी विना ।
क्व दृष्टं किं च ते पक्षे न प्रत्यक्षं वियत्खलु ॥४३

अन्वयार्थ- [निर्जगद्व्योम दृष्टं चेत्] जगद्रहित आकाश दिसलें असें जर म्हणशील तर [प्रकाशतमसी विना तत् क्व दृष्टम्-] प्रकाश व अंधकार यांवांचून तें कोठें दिसलें ? [किं च ते पक्षे वियत् प्रत्यक्षं न खलु-] शिवाय तुझ्या मतामध्यें आकाशाचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं !

प्रकाश:- जगाचा नाश झाल्यानंतर आकाश असतें व तें आम्ही पाहतों असें जर म्हणशील तर तें तुझें म्हणणें अयोग्य आहे. कारण सृष्टिकालीं सुद्धां जर आकाशाचें प्रत्यक्ष ज्ञान होत नाहीं, तर मग सृष्टीनंतर म्हणजे ज्या कालीं तूं, आम्हीं व अन्य कांहींहि नसतें त्याकालीं आकाश कसें दिसणार ? शिवाय शब्दगुणक आकाश तुम्ही प्रत्यक्ष मानितां. तेव्हां 'त्याचें आम्ही अनुमान करितों' असेंहि तुम्हांला म्हणतां येणार नाहीं, प्रकाश व अंधकार यांनीं रहित असलेल्या आकाशाला तूं कोठें व केव्हां पाहिलेंस ? प्रकाशरहित असलेल्या त्याचें दर्शन संभवत नाहीं. असो. आम्ही आकाश अप्रत्यक्ष आहे असें मानितों. व आम्हांला जो त्याचा

भास होतो तो सूर्यप्रकाश व अंधकार यांच्या द्वारा होत असल्यामुळें खरा नव्हे. तात्पर्य जगद्रहित आकाश असतें हें म्हणणें अयोग्य आहे ॥४३॥

-'अहोपण अप्रत्यक्षत्व आकाशाप्रमाणें सद्वस्तूच्या ठिकाणींहि आहे. म्हणजे आकाश जसें प्रत्यक्ष दिसत नाहीं तसेंच सत्‌हि प्रत्यक्ष दिसत नाहीं.' म्हणून म्हणशील तर सद्वस्तु सर्वानुभवसिद्ध आहे, असें समाधान सांगतात-

सद्वस्तु शुद्धं त्वस्माभिर्निश्चितैरनुभूयते ।
तूष्णीं स्थितौ न शून्यत्वं शून्यबुद्धेश्च वर्जनात्
॥४४

अन्वयार्थ- **[तूष्णीं स्थितौ अस्माभिः निश्चितैः शुद्धं सद्वस्तु अनुभूयते-] स्वस्थ-सर्व अंतर्बहिरिंद्रियांचा व्यापार बंद करून-बसलें असतां-तूष्णीं अवस्थेंत आम्हां अनुभवी पुरुषांना अद्वितीय सद्वस्तूचा अनुभव येतो. [च शून्यबुद्धेः वर्जनात्-] त्या अवस्थेंत शून्याचा प्रत्यय येत नाहीं. त्यामुळें [शून्यत्वं न तु अनुभूयते-] शून्यत्वाचा अनुभव येत नाहीं.**

प्रकाशः- आम्ही केवळ श्रुति व स्मृतीवर श्रद्धा ठेवतो; म्हणून तुम्हा तार्किकांचा आमच्यावर मोठा कटाक्ष व आरोप आहे खरा; पण, आमच्या पूर्व आचार्यांनीं उत्तरमीमांसेंत तुमच्या केवळ शुष्क तर्कांची किती किंमत करावयाची हें सांगून ठेवलें असल्यामुळ श्रुतिस्मृतिइतिहासपुराणप्रोक्त तत्त्वांचा प्रयत्नवान् पुरुषाला साक्षात् अनुभव येत असल्यामुळें, त्याची आम्हांला यत्किंचित्‌हि क्षिति वाटत नाहीं. आकाश जसें दिसत नाहीं तशी सद्वस्तुहि दिसत नाहीं म्हणून म्हणाल तर तें बरोबर नाहीं. कारण तूष्णीं-स्थितींत आत्मसाक्षात्काराच्या योगानें सद्वस्तूचा अनुभव येतो. गुरुपरंपरेनें श्रुतिसिद्धांत समजून घेऊन त्यांच्या सांगण्याप्रमाणें उपासना केली असतां आमची चित्तशुद्धि होते. आणि त्यामुळें चित्तसमाधानकालीं सत्स्वरूपाचा आम्ही यथेच्छ अनुभव घेतों. तुमच्या म्हणण्याप्रमाणें आम्हांला त्या अवस्थेंत शून्य (आकाश) कधींच भासत नाहीं. **निश्चितैः-** पूर्व आचार्यांपासून स्वगुरूंपर्यंत ब्रह्मवेत्त्यांनीं सांगितलेला वेदान्त व त्याला अनुकूल तर्क यांचा साक्षात् ज्यांनीं निर्णय केला आहे अशा आम्ही. ॥४४॥

-अहो, पण तृष्णीं स्थितीमध्यें शून्यबुद्धि जशी नसते, तशीच सद्‌बुद्धिहि नसते; त्यामुळें त्यावेळीं सत्त्वहि संभवत नाहीं, अशी शंका-

सद्‌बुद्धिरपि चेन्नास्ति मास्त्वस्य स्वप्रभत्वतः ।
निर्मनस्कत्वसाक्षित्वात्सन्मात्रं सुगमं नृणाम्
॥४५

अन्वयार्थ- **[तत्र सद्‌बुद्धिः अपि नास्ति इति चेत्] तूष्णीं स्थितींत सद्‌बुद्धिहि नसते, असें म्हणशील तर [अस्य स्वप्रभत्वतः मा अस्तु-] ही सद्वस्तु स्वप्रकाश असल्यामुळें त्या दशेंत सद्‌बुद्धि नसेना ! ती नसणें आम्हांला अनिष्ट नाहीं. [निर्मनस्कत्वसाक्षित्वात् सन्मात्रं नृणां सुगमं अस्ति-] तें सत् त्या निर्मनस्कत्व अवस्थेचें-तूष्णीं दशेचें साक्षी असल्यामुळें शुद्ध सद्वस्तु साधकांना सुलभ आहे.**

प्रकाशः- सर्व अंतर्बहिरिंद्रियांना व्यापार करूं न देतां शांत ठेवणें ही 'तूष्णीं' स्थिति होय. ह्या स्थितींत अंतःकरणहि उपरम पावत असल्यामुळें सद्‌बुद्धी नसते असें जें वाद्याचें म्हणणें आहे तें आम्हांला अनिष्ट नाहीं. कारण वेदान्तप्रतिपादित सद्वस्तु दिव्याप्रमाणें स्वप्रकाश आह आणि ती संकल्पादिरूप अंतःकरण लीन झाल्याचेंहि साक्षात् पहात असते. त्यामुळें ती साधकांना अगदीं सुलभ आहे ॥४५॥

-ह्याप्रमाणें प्रपंचशून्य जें साक्षिचैतन्य त्याचें तृष्णीं अवस्थेंत भान होतें, हें सांगून आतां त्याच दृष्टान्तानें सृष्टीच्या पूर्वींहि सद्वस्तु तशीच होती असें ज्ञान होणें शक्य आहे, असें सांगतात-

मनोजृम्भणराहित्ये यथा साक्षी निराकुलः ।
मायाजृम्भणतः पूर्वं सत्तथैव निराकुलम् ॥४६

अन्वयार्थ- [मनोजृंभणराहित्ये साक्षी यथा निराकुल:-] मन वृत्तिशून्य असतांना साक्षिचैतन्य जसें शांत-सर्व विक्षेपशून्य असतें, [तथा एव मायाजृंभणत: पूर्वं सत् निराकुलं वर्तते-] तसेंच मायेचा विकास होण्यापूर्वीं सत् स्वस्थ-स्वरूपांत स्थित असतें.

प्रकाश:- याच विषयीं दुसरा दृष्टान्त असा-वारा नसतांना समुद्र जसा अत्यंत शांत असतो व सोसाट्याचा वारा सुटला असतां जो असा अगदीं खवळून जातो तसेंच साक्षीचैतन्य वृत्त्युत्पत्तीपूर्वीं व सत् सृष्ट्युत्पत्तीपूर्वी शांत असतें; व त्या त्या उपाधींचा प्रादुर्भाव झाला असतां त्यांच्या योगानें तें खवळून गेल्यासारखें दिसतें. याविषयीं शतश्लोकींतील 'यद्वत्पाथस्तरंगै: प्रचलति' इत्यादि श्लोक पहावा. ॥४६॥

-आतां मायेचें लक्षण सांगतात-

निस्तत्त्वा कार्यगम्याऽस्य शक्तिर्मायाग्निशक्तिवत् ।
न हि शक्ति: क्वचित्कैश्चिद्बुध्यते कार्यत: पुरा ॥४७

अन्वयार्थ- [अग्निशक्तिवत् निस्तत्त्वा कार्यगम्या अस्य या शक्ति: सा माया-] अग्नीच्या शक्तीप्रमाणें तत्त्वशून्य व कार्यावरूनच ज्ञात होणारी अशी जी ह्या सद्रूप आत्म्याची शक्ति तीच माया होय. [कार्यत: पुरा कैश्चित् क्वचित् शक्ति: न बुध्यते हि-] कार्याच्या पूर्वीं कोणालाहि कधीं शक्तीचें ज्ञान होत नाहीं, हें प्रसिद्ध आहे.

प्रकाश:- अग्नीमध्यें काय शक्ति आहे हें त्याला स्पर्श केल्यावांचून समजत नाहीं. पण एकदां त्याला स्पर्श केला कीं त्याच्या दाहशक्तीचा प्रत्यय येतो व नंतर अग्नींत दाह शक्ति आहे असें आपण समजू लागतों. तशीच ह्या परमात्म्याची माया ही शक्ति आहे. आकाशादि कार्य उत्पन्न होईपर्यंत तिचा प्रत्यय येत नाहीं; पण आकाशादि सृष्टीनंतर तिचें भान होऊं लागतें. हा व्यावहारिकच नियम आहे कीं, कोणाची शक्ति किती आहे हें परिणामावांचून समजत नाहीं. ही परमात्मशक्ति निस्तत्त्व जगाला कारण होणाऱ्या परमात्म्याहून हिला पृथक् सत्ता नसते आणि त्यामुळेंच ही मिथ्या असें आम्ही म्हणतों. ॥४७॥

-याप्रमाणें मायेचें केवल कार्यावरूनच ज्ञान होतें असें सांगून आतां तिच्या निस्तत्त्वरूपत्वाचें उपपादन करितात-

न सद्वस्तु सत: शक्तिर्न हि वन्हे: स्वशक्तिता ।
सद्विलक्षणतायां तु शक्ते: किं तत्त्वमुच्यताम् ॥४८

अन्वयार्थ- [सत: शक्ति: सद्वस्तु न हि-] सत्‌ची शक्ति सद्रूपच असणार नाहीं. [हि वह्ने: स्वशक्तिता न भवति-] कारण अग्नीच अग्नीची शक्ति नव्हे. [तु सद्विलक्षणतायां शक्त: किं तत्त्वं उच्यताम्-] मग सत्‌ची शक्ति सत्पेक्षां विलक्षण जर आहे, तर तिचें तत्त्व काय तें सांग पाहूं.

प्रकाश:- सद्रूप परमात्म्याची शक्ति तद्भिन्न असल्यामुळें सद्रूप असूं शकणार नाहीं; हें उघडच आहे. व्यवहारांतसुद्धां पदार्थाहून शक्ति पृथक् मानितात. अग्नि ह्या पदार्थाहून त्याची दाह शक्ति निराळी आहे असाच अनुभव येतो. कारण असें जर नसतें तर मणि इत्यादिक दाहशक्तीला प्रतिबंध करणाऱ्या पदार्थाच्या योगानें तिचा निरोध झाला नसता; पण मणी हातांत घेऊन अग्नीला स्पर्श केला असतां हात भाजत नाहीं, असा सर्वत्र अनुभव आहे. अर्थात् पदार्थाहून शक्ति भिन्न असते ही गोष्ट सिद्ध झाली; पण पदार्थांमध्यें विलक्षणता (सारखेपणा नसणें) असल्यावांचून ते भिन्न होत नाहींत असा सर्वत्र अनुभव आहे. तेव्हां यावरून सद्रूप आत्मा व शक्ति माया यांची भिन्नता व विलक्षणता सिद्ध झाली. म्हणून आतां माया जर सत्‌हून विलक्षण आहे तर तिचें तत्त्व (खरें रूप) काय, तें सांगा बरें ? असा प्रश्न परमेश्वराच्या शक्तीविषयीं भांडणाऱ्या वाद्यांना आम्हीं करितों. बरें, शक्तीला 'असत्' म्हणावें तर तिचें तत्त्व काय ! 'असत्' म्हणजे पुरुषाच्या शिंगाप्रमाणें असत् कीं सत्-हून विलक्षण ? ॥४८॥

-यांतील पहिल्या पक्षाचा अनुवाद करून त्यावर दोष देतात-

शून्यत्वमिति चेच्छून्यं मायाकार्यमितीरितम् ।
न शून्यं नापि सद्यादृक्तादृक्तत्त्वमिहेष्यताम् ॥४९

अन्वयार्थ- [शून्यत्वं इति चेत्-] शून्यत्व हेंच मायेचें तत्त्व आहे असें जर म्हणशील तर [तत् शून्यं मायाकार्यं अस्ति इति पूर्वं ईरितं-] तें शून्य मायेचें कार्य आहे असें पूर्वी 'शून्यं चेत् जीव्यतां चिरं' या वाक्यांत सांगितलेंच आहे. [तस्मात् न शून्यं न अपि सत्-] यास्तव शून्यहि नव्हे व सत्हि, नव्हे [इति यादृक् तादृक् तत्त्वं इह इष्यताम्-] अशा प्रकारचें कांहीं मायेचें स्वरूप मानावें.

प्रकाश:- शून्याचें ज्ञानसुद्धां प्रमात्या (द्रष्ट्या) वांचून होत नाहीं. प्रमाता मायेच्या व्यक्तीनंतर अस्तित्वांत येत असतो, असा सिद्धान्त व अनुभवहि आहे. तस्मात् शून्य हें मायेचें कार्य आहे ही गोष्ट सिद्ध झाली -याचा आम्ही पूर्वींहि निर्देश केलाच आहे. यास्तव मायेचें स्वरूप सर्व व्यावहारिक पदार्थांहून भिन्न असल्यामुळें व्यवहारिक पदार्थांसारखें तें वाच्य [सांगण्यास योग्य] नाहीं. तस्मात् शून्यहि नव्हे व सद्रूपहि नव्हे असें कांहीं विलक्षण पण मिथ्या असें तिचें रूप आहे, हीच गोष्ट अबाधित होय. ॥४९॥

-याविषयीं श्रुतीचें प्रमाण-

नासदासीन्नो सदासीत्तदानीं किंत्वभूत्तम: ।
सद्योगात्तमस: सत्त्वं न स्वतस्तन्निषेधनात् ॥५०

अन्वयार्थ- [तदानीं असत् न आसीत्-] प्रलय कालीं असत्-शून्य नव्हतें. [सत् अपि नो आसीत्-] व सत्-विद्यमान असेंहि कांहीं नव्हतें. [किंतु तम: अभूत्-] तर तम होतें. [तस्य तमस: सद्योगात् सत्त्वं-] त्या तमाला सद्वस्तूच्या आश्रयानेंच सत्त्व असतें. [तन्निषेधनात् स्वत: सत्त्वं न विद्यते-] श्रुति-स्मृतींत निषेध केलेला असल्यामुळें त्याला स्वत:चें सत्त्व नसतें.

प्रकाश:- 'तम आसीत्तमसा गूढमग्रे' (ऋ. सं. अष्ट. ८ अध्या. ७ वर्ग. १७ मं. १) 'पूर्वी तम होतें व तमांत हें सर्व जग गूढ होतें' अशी श्रुति याला प्रमाण आहे. शून्यादि होतें असें मानल्यास कोणकोणचे दोष येतात हें पूर्वी दाखविलेंच आहे. तात्पर्य, सदसद्विलक्षण भावरूप असें कांहीं त्या कालीं होतें असें मानणेंच युक्त आहे. **शंका**-सत् पदार्थांहून सुद्धा विलक्षण असें जर कांहीं होतें तर 'तम होतें' असा तरी सद्रूप कसा निर्देश करितां ? **समाधान**- तें सदसद्विलक्षण तम सद्रूप परमात्म्याच्याच आश्रयानें रहात असल्यामुळें त्याच्या सत्तेनें हें सत्तावान् होतें व त्यामुळें 'तम होतें' असा श्रुति निर्देश करतें. यावरून तें तम म्हणजे मूल अज्ञान स्वत:सत्ताशून्य व त्यामुळेंच मिथ्या असें आम्ही नि:शंकपणें म्हणतों. ॥५०॥

-आता निर्णय सांगतात.

अत एव द्वितीयत्वं शून्यवन्न हि गण्यते ।
न लोके चैत्रतच्छक्त्योर्जीवितं लिख्यते पृथक् ॥५१

अन्वयार्थ - [अत एव तस्या: शक्ते: शून्यवत् द्वितीयत्वं न गण्यते हि-] म्हणूनच त्या शक्तीची शून्याप्रमाणें द्वितीयत्वानें गणना केली जात नाहीं. [लोके चैत्रतच्छक्त्यो: जीवितं पृथक् न लिख्यते-] व्यवहारांत 'चैत्र-' नांवाचा मनुष्य व त्याची शक्ति यांचें वेतन निरनिराळें लिहीत नाहींत.

प्रकाश:- शून्याची जशी स्वतंत्रपणें कधींच कोठें गणना करीत नाहींत, याप्रमाणेंच स्वत:सत्ताशून्य अशा शक्तीचीहि आम्ही शक्तिवानाहून निराळी गणना मुळींच करीत नाहीं. व्यावहारिक न्यायहि असाच आहे. देवदत्त नांवाच्या लेखकाकरितां ५ रुपये वेतन व त्याच्या शक्तीकरितां १० रुपये वेतन असा पृथक् हिशेब कधींच कोणीं करीत नाहीं. तस्मात् शक्ति पुरुषाहून (आश्रयीहून) जरी भिन्न आहे तरी स्वत: सत्ताशून्य असल्यामुळें आश्रयी पुरुषाच्या सत्तेनेंच सत्तावान् होते

ही गोष्ट निश्चित झाली. ॥५१॥

-अहो, पण एखाद्याची शक्ति अधिक असली म्हणजे त्याचें वेतन वाढतें, तेव्हां शक्तीला पृथक् जीवितत्व आहे, तिची गणना होते, असें म्हणावें लागतें', अशी शंका घेऊन तिचें समाधान करितात-

शक्त्याधिक्ये जीवितं चेद्वर्धते तत्र वृद्धिकृत् ।
न शक्तिः किंतु तत्कार्यं युद्धकृष्यादिकं तथा ॥५२

अन्वयार्थ- [शक्त्याधिके जीवितं वर्धते चेत्-] **शक्ति अधिक असली म्हणजे वेतन वाढतें असें जर म्हणशील [तत्र शक्तिः वृद्धिकत् न भवति-] तर शक्ति वेतनाची वृद्धि करीत नाहीं. [किंतु युद्ध-कृष्यादिकं तत्कार्यं एव तथा अस्ति-] तर युद्ध, शेतकी इत्यादि तिची कार्यें त्याची वृद्धि करितात.**

प्रकाश:- प्राण्याची जशी कमी अधिक शक्ति असेल तसें त्याचें वेतन वाढतें हें म्हणणें अगदीं चुकीचें आहे. कारण एकादा प्राणी मोठा सशक्त आहे; पण काम करीत नाहीं तर त्याला त्याच्या शक्तीच्या मानानें वेतन मिळत नाहीं. पण तेंच एकाद्या अशक्त प्राण्यानें जर अधिक महत्त्वाचें काम केलें तर त्याला त्याबद्दल योग्य वेतन मिळतें. सारांश, प्राण्याची योग्यता त्याच्या कृत्यांनीं वाढतें. शक्तीनें कधींच वाढत नाहीं, असा सर्वत्र अनुभव आहे. पंडित अच्युतराय मोडक यांनीं जीवित पदाचा आयुष्य असा अर्थ करून व या श्लोकाला तदनुरूप अवतरण देऊन समाधान केलें आहे. त्याचें थोडक्यांत येथें तात्पर्य देतों- **शंका-** लोकांत प्राणी व त्याची शक्ति यांची पृथक् गणना करीत नाहींत. हें जरी खरें आहे, तरी शक्ति अधिक असली कीं आयुष्य वाढतें असें हत्ती इत्यादि प्राण्यांकडे पाहिलें असतां वाटतें. त्यामुळें जीवितकार्यावरून शक्तिकारणाविषयीं निश्चयानें अनुमान करितां येतें. कसें म्हणाल तर पहा-चैत्र हा मनुष्य अधिक शक्तिमान् आहे. (प्रतिज्ञा) कारण त्याचें आयुष्य अधिक आहे. (हेतु). हत्तीप्रमाणे (दृष्टान्त). **समाधान-** हें तुमचें अनुमान अयोग्य आहे. कारण हेतु व साध्य (प्रतिज्ञानिर्दिष्ट) यांमध्यें कार्यकारणभाव असावा लागतो; पण या तुमच्या अनुमानानेंच जर आधिक्यधर्म व धर्मी यांचा पृथक्पणा सिद्ध करून दाखवावयाचा असेल, तर पूर्वोक्त हेतु व साध्य यांच्यामध्यें कार्यकारणभाव येत नाहीं. कारण जीवित अधिक असणें हें जरी घटकाभर अधिक शक्तीचें कार्य मानिलें, तरी त्यामुळें शक्तीची व्यवहारांत पृथकत्त्वानें गणना करितात हें सिद्ध होत नाहीं. शिवाय तुम्ही जीवित या शब्दाचा आयुष्य असा अर्थ करितां कीं बल असा अर्थ करितां ? आयुष्य असा जर अर्थ करीत असाल तर दीर्घायुषी कावळा अधिक शक्तियुक्त असल्याचें कोठें दिसत नाहीं. बरें बल असा अर्थ कराल तर युद्ध, शेती, भार उचलणें इत्यादि कार्यावांचून केवल आकृतीवरूनच बलाचें अनुमान होत नाहीं. तात्पर्य, शक्तिमान् जरी अगदीं भिन्न आहे, तरी शक्तीला स्वतंत्रपणें सत्ता नसल्यामुळें तिची पृथक्पणे कोठेंच गणना होत नाहीं आणि त्यामुळेंच ती निःसत्त्व आहे. ॥५२॥

-ह्या प्रतिपादनाचा उपसंहार करितात-

सर्वथा शक्तिमात्रस्य न पृथग्गणना क्वचित् ।
शक्तिकार्यं तु नैवास्ति द्वितीयं शक्यते कथम् ॥५३

अन्वयार्थ- [सर्वथा शक्तिमात्रस्य पृथक् गणना क्वचित् अपि न भवति-] सर्वथा-कोणत्याहि प्रकारें शास्त्रीय किंवा लौकिक व्यवहारांत केवल शक्तीची पृथक् गणना कोठेंहि करीत नाहींत [शक्तिकार्यं तु नास्ति एव-] प्रलयकालीं शक्तीचें कार्य तर नसतेंच [द्वितीयं कथं शक्यते-] मग द्वितीयत्वाची शंका कशी येणार !

प्रकाश:- सर्वथा-शास्त्रीय किंवा वैदिक व्यवहारांत. सृष्टीच्या उत्पत्तीनंतर मायाकार्याची प्रतीति येत असल्यामुळें प्रलयकालीं मायाकार्याचें नांवहि नसतें. अर्थात् शक्तीमुळें जरी नाहीं तरी कार्यामुळें सत्‌ला सद्वितीयत्व असेल असेंहि म्हणतां येत नाहीं. तेव्हां तेथें सत्‌वांचून अन्य कांहीं पदार्थ होता हें म्हणणें

कधींतरी युक्त होईल काय ? ॥५३॥

-पण संत्‌ची शक्ति-माया सर्व सद्वस्तूला व्यापून राहते कीं त्याच्या कांहीं भागांत मात्र राहते. प्रथम पक्ष स्वीकारला तर मुक्तांना प्राप्त होणाऱ्या शुद्ध ब्रह्माचा अभाव होतो आणि त्यामुळें मोक्षाची असिद्धि होते व दुसरा पक्ष स्वीकारला तर 'निरंश ब्रह्माच्या अंशाला ती व्यापिते' असें म्हणावें लागतें; पण तेंहि अयोग्य आहे, अशी आशंका घेऊन ग्रंथकार म्हणतात-

न कृत्स्नब्रह्मवृत्तिः सा शक्तिः किन्त्वेकदेशभाक्।
घटशक्तिर्यथा भूमौ स्निग्धमृद्येव वर्तते ॥५४

अन्वयार्थ- [सा शक्तिः कृत्स्नब्रह्मवृत्तिः न भवति-] ती शक्ति सर्व ब्रह्मामध्यें रहाणारी नाहीं. [किंतु यथा भूमौ स्निग्धमृदि एव घटशक्तिः वर्तते-] तर भूमींत ओल्या मातीच्या ठिकाणींच जशी घटशक्ति असते [तथा सा एकदेशभाक् अस्ति-] तशी ती ब्रह्माच्या कांहीं भागांत राहते.

प्रकाशः- सर्व ब्रह्मवृत्ति म्ह० सर्व ब्रह्माला व्यापून रहाणारी. ज्याप्रमाणें अग्नीची दाहशक्ति अग्नीला सर्वत्र व्यापून राहते तशी ही आहे कीं कांहीं अंशाला मात्र व्यापिते ? अशी शंका आहे. कसेंहि जरी उत्तर दिलें तरी त्यावर दोष येत असल्यामुळें, सोदाहरण उत्तर देऊन वस्तुतः जरी ब्रह्म निरंश आहे तरी उपाधीमुळें त्याच्या ठिकाणीं अंशांचा आरोप होतो, असें सुचविलें आहे. ह्याचें खरें तथ्य पुढें अठ्ठावनाव्या श्लोकांत स्पष्ट होईल. ॥५४॥

-याविषयीं श्रुतिप्रमाण देतात-

पादोऽस्य सर्वा भूतानि त्रिपादस्ति स्वयंप्रभः ।
इत्येकदेशवृत्तित्वं मायाया वदति श्रुतिः ॥५५

अन्वयार्थ- [सर्वा भूतानि अस्य पादः-] हीं सर्व भूतें त्याचा एक पाद असून [स्वयंप्रभः त्रिपात् अस्ति-] तो स्वयंप्रकाश परमात्मा तीन पादानें अवशिष्ट आहे, त्याचे तीन पाद शुद्धावस्थेंत आहेत. [इति मायायाः एकदेशवृत्तित्वं श्रुतिः वदति-] असें ह्या मायेचें परमात्म्याच्या एका भागांत रहाणें श्रुति सांगते.

प्रकाशः- सर्व सृष्टी हा त्या नारायणाचा एक भाग आहे व तो स्वतः ह्या सृष्टीच्या पलीकडे अनंत प्रमाणानें आहे. वस्तुतः त्याचें जरी परिमाण करितां येत नाहीं, तरी अविद्योपाधीमुळें त्याच्यावर असा अंशाचा आरोप होत असतो व तो तरी केवल शिष्योपदेशाकरितांच आहे. ॥५५॥

-केवल पूर्वोक्त छान्दोग्य श्रुतिच याला प्रमाण आहे असें नाहीं. तर श्रुतीचा अर्थ निश्चित करणारें स्मृतिवचनहि याला प्रमाण आहे, असें सांगतात-

विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ।
इति कृष्णोऽर्जुनायाह जगतस्त्वेकदेशताम् ॥५६

अन्वयार्थ- [अहं इदं कृत्स्नं जगत् एकांशेन विष्टभ्य स्थितः अस्मि-] मी हें सर्व जगत् एका अंशानें व्यापून राहिलों आहें. [इति कृष्णः तु जगतः एकदेशतां अर्जुनाय आह-] असें भगवान् कृष्णानेंहि जगाचें एकदेशत्व अर्जुनाला सांगितलें आहे.

प्रकाशः- केवल पूर्वोक्त पुरुषसूक्तस्थ श्रुतिच याला प्रमाण आहे असें नव्हे. तर श्रुतीचा अर्थ निश्चित करणारें स्मृतिवचनहि भ. गी. (१०-४२) याला प्रमाण आहे असें या श्लोकांत स्पष्टपणें सांगितलें आहे. ॥५६॥

-आतां मायारहित स्वरूपाच्या अस्तित्वाविषयीं ऋग्वेदस्थ पुरुषसूक्तांतील वचनाचें प्रमाण देतात-

स भूमिं विश्वतो वृत्वा ह्यत्यतिष्ठद्दशांगुलम् ।
विकारावर्ति चात्रास्ति श्रुतिसूत्रकृतोर्वचः ॥५७

अन्वयार्थ - [भूमिं विश्वतः वृत्वा सः दशांगुलं अत्यतिष्ठत् हि-] ह्या भूमीला-सृष्टीला-सर्वतः

व्यापून तो ईश्वर दशांगुळें अवशिष्टहि राहिला आहे. [विकारावर्ति च-] तसेंच विकारामध्यें न रहाणारें असें आत्म्याचें नित्य रूपहि आहे. [इति श्रुति-सूत्रकृतो: वच: अत्र अस्ति-] अशा अर्थाची श्रुति व वेदान्तसूत्रकार जे व्यास त्यांचें वचन याविषयीं प्रमाण आहे.

प्रकाश:- पूर्वोक्त श्रुति व स्मृति यांना बळकटी आणणारीं अशीं आणखीं कांहीं प्रमाणें येथें दिलीं आहेत. 'स भूमिं' इत्यादि श्रुति तर सर्व प्रसिद्ध आहेत. या पुरुषसूक्तस्थ ऋचेचा अर्थ असा- 'तो परमात्मा ही सर्व द्वैतरूप सृष्टि सर्वत: व्यापून त्याच्या पलीकडे आणखी अनंत प्रमाणानें स्वत:च्या शुद्ध रूपानें राहिला आहे.' तसेंच- 'विकारावर्ति च तथा हि स्थितिमाह' वे. सू. ४-४-१९ हें सूत्रहि हीच स्थिति प्रतिपादन करीत आहे. त्या सूत्राचा अर्थ असा-विकारभूत द्वैतांत न राहणारें असें परमेश्वराचें शुद्ध रूपहि आहे व तसेंच श्रुतीनें सांगितलें आहे. तात्पर्य सृष्टि हा परमेश्वराचा अगदीं क्षुल्लक असा एक भाग आहे, ही गोष्ट श्रुति, स्मृति व न्याय यांनीं सिद्ध झाली ॥५७॥

-अहो, पण ही सृष्टि जर त्या परमेश्वराचा एक भाग आहे, तर मग तो निरंश कसा ?' समाधान-

निरंशेऽप्यंशमारोप्य कृषत्स्नेंऽशे वेति पृच्छत: ।
तद्भाषयोत्तरं ब्रूते श्रुति: श्रोतृहितैषिणी ॥५८

अन्वयार्थ- [निरंशे अपि अंशं आरोप्य-] अंशरहित ब्रह्माच्या ठिकाणीं अंशाचा आरोप करून [इदं कृत्स्ने अंशे वा इति पृच्छत:-] हें द्वैत सर्व ब्रह्माच्या आश्रयानें रहातें कीं त्याच्या कांहीं भागाच्या आश्रयानें ? असें विचारणाऱ्या शिष्याला किंवा वाद्याला उद्देशून [श्रोतृहितैषिणी श्रुति:-] श्रोत्याचें हित इच्छिणारी श्रुति [तद्भाषया उत्तरं ब्रूते-] त्याच्या भाषेनेंच उत्तर देत आहे.

प्रकाश:- परमात्म्याचें निरंशत्व वास्तविक आहे. व सांशत्व काल्पनिक आहे; त्यामुळें कांहीं विरोध नाहीं. ॥५८॥

-आतां ज्यासाठीं ब्रह्मामध्यें मायेचें समर्थन केलें तें प्रयोजन सांगतात-

सत्तत्त्वमाश्रिता शक्ति: कल्पयेत्सति विक्रिया: ।
वर्णा भित्तिगता भित्तौ चित्रं नानाविधं यथा ॥५९

अन्वयार्थ- [यथा भित्तिगता: वर्णा: भित्तौ नानाविधं चित्रं कल्पयन्ति-] ज्याप्रमाणें भिंतीवरील रंग भिंतीवर नानाप्रकारच्या चित्रांची कल्पना करवितात, [तथा सत्तत्त्वं आश्रिता शक्ति:-] त्याप्रमाणें सत्तत्त्वाचा आश्रय करून रहाणारी ही शक्ति [सति विक्रिया: कल्पयेत्-] 'सत्' वस्तूवर नाना प्रकारचे पदार्थ-विषय भासविते.

प्रकाश:- भिंतीवर तांबड्या, काळ्या, जांभळ्या इत्यादि रंगांनीं चित्रें काढितात हें सर्वप्रसिद्ध आहे. वस्तुत: तीं चित्रें म्हणजे भिंतच होय; पण रंगाच्या योगानें तिच्याकडे पहाणाराला ते राक्षसादिक दिसतात. त्याचप्रमाणें वस्तुत: हें द्वैत म्हणजे सत्‌च होय; पण मायेच्या योगानें तें प्राकृत पुरुषांना नाना प्रकारच्या पदार्थाच्या रूपानें भासतें. ॥५९॥

-मायेमुळें भासणाऱ्या ह्या सृष्टींतील प्रथम कार्य कोणतें तें आतां सांगतात-

आद्यो विकार आकाश: सोऽवकाशस्वरूपवान् ।
आकाशोऽस्तीति सत्तत्त्वमाकाशेऽप्यनु गच्छति ॥६०

अन्वयार्थ- [आद्य: विकार: आकाश:-] पहिला विकार आकाश आहे. [स: च अवकाशस्वरूपवान् अस्ति-] व अवकाश हेंच त्याचें स्वरूप आहे. [आकाश: अस्ति इति आकाशे अपि सत्तत्त्वं अनुगच्छति-] आकाश हें ब्रह्माचें कार्य आहे याविषयीं युक्ति- 'आकाश आहे' असा शब्दप्रयोग होत असल्यामुळें आकाशांतहि सत्तत्त्वाची अनुवृत्ति होतें.

प्रकाश:- ह्या मायाकल्पित सृष्टींत अनेक विकार

आहेत असें पूर्वीं सांगितलें; पण त्यांचा क्रम कसा आहे हें सांगण्याकरितां हें पुढील प्रकरण सुरू केलें आहे. आकाश हें या सृष्टींतील पहिलें कार्य आहे. अवकाश हेंच याचें रूप आहे. तें सत्च्या आश्रयानेंच रहात असल्यामुळें 'आकाश आहे' असा त्याचा सत्तायुक्त व्यवहार होतो. कारणाचे गुण कार्यात येतात असा न्याय आहे. त्यामुळें परम कारण जें सत् त्याची सत्ता आकाशरूप मायिक कार्यांत आली आहे. तात्पर्य, आकाश स्वतः सत्ताशून्य असून कारणभूत ईश्वराच्या सत्तेनें सत्तावान् झालें आहे. ॥६०॥

-त्यामुळें काय होतें तें सांगतात-

एकस्वभावं सत्तत्त्वमाकाशो द्विस्वभावकः ।
नावकाशः सति व्योम्नि स चैषोऽपि द्वयं स्थितम् ॥६१

अन्वयार्थ- [सत्तत्त्वं एकस्वभावं-] सत्तत्त्वाचा सत्तारूप एकच स्वभाव आहे. [च आकाशः द्विस्वभावकः अस्ति-] पण आकाशाचे दोन स्वभाव आहेत. [सति अवकाशः न अस्ति-] हाच अर्थ विशद करितात-सद्वस्तूमध्यें अवकाश नसतो. [व्योम्नि तु सः च एषः अपि इति द्वयं स्थितम्-] पण आकाशांत सत्स्वभाव व अवकाश असे दोन्ही आहेत.

प्रकाशः- अवकाश म्हणजे पोकळी, सर्व मूर्त व अमूर्त द्रव्यांना राहण्यास जागा देणारें भूत. सर्व सृष्टि ह्या आकाशांत रहात असल्यामुळें तें सर्वाहून व्यापक (अधिकदेशवृत्ति) व सर्वापेक्षां जुनें आहे. सद्वस्तूंत अवकाश नाहीं. एक सत्स्वभावच आहे. पण आकाशांत सत्ता व अवकाश दोन्ही आहेत असा भावार्थ. ॥६१॥

-सत् एक स्वभावाचें व आकाश दोन स्वभावाचें आहे. याचेंच अन्य तऱ्हेनें उपपादन करितात-

यद्वा प्रतिध्वनिर्व्योम्नो गुणो नासौ सतीक्ष्यते ।
व्योम्नि द्वौ सद्ध्वनी तेन सदेकं द्विगुणं वियत् ॥६२

अन्वयार्थ- [यद्वा प्रतिध्वनिः व्योम्नः गुणः अस्ति-] किंवा प्रतिध्वनि हा आकाशाचा गुण आहे. [असौ सति न ईक्ष्यते-] तो सद्वस्तूंत प्रतीत होत नाहीं, [व्योम्नि तु सद्ध्वनी द्वौ गुणौ-] पण आकाशांत सत्ता व शब्द असे दोन गुण आहेत. [तेन सत् एकं वियत् च द्विगुणं इति सिद्धम्-] त्यामुळें सत् एकगुण व आकाश द्विगुण ही गोष्ट सिद्ध झाली.

प्रकाशः- पूर्वी प्रतिध्वनि हा आकाशाचा मुख्य धर्म आहे असें सांगितलें आहे. म्हणून त्या दृष्टीनेंहि पूर्वोक्त गोष्टच सिद्ध होते हें दाखविण्याकरितां हा श्लोक प्रवृत्त झाला आहे. **सत् एकं म्ह०** सद्वस्तु द्वैतशून्यच आहे; पण स्वाज्ञानानें पुढें निर्माण होणारें कल्पित जग स्वात्मज्ञान होईपर्यंत सद्वस्तूच्या आश्रयानेंच सत्तावान् भासत असतें. ॥६२॥

-'अहो, पण आकाश जर सद्ब्रह्माचें कार्य आहे, तर लोकांना 'आकाशाची सत्ता' अशी उलट प्रतीति कां येते ?' उत्तर -

या शक्तिःकल्पयेद्व्योम सा सद्व्योम्नोरभिन्नताम् ।
आपाद्य धर्मधर्मित्वं व्यत्ययेनावकल्पयेत् ॥६३

अन्वयार्थ- [या शक्तिः व्योम कल्पयेत्-] जी मायाशक्ति सद्वस्तूच्या ठिकाणीं आकाशाची कल्पना करविते, [सा प्रथमतः सद्व्योम्नोः अभिन्नतां आपाद्य-] ती प्रथमतः सत् व आकाश यांचा अभेद कल्पून. [पश्चात् व्यत्ययेन धर्मधर्मित्वं कल्पयेत्-] नंतर विपरीतपणानें त्यांच्या धर्म-धर्मिपणाची कल्पना करविते.

प्रकाशः- वस्तुतः सत्चें आकाश असाच व्यवहार होणें योग्य आहे; पण परमेश्वराची अचिन्त्य शक्ति जी माया, ती अंधकार व प्रकाश यांच्याप्रमाणें परस्पर विरुद्ध धर्मी जें सत् व आकाश यांचें तादात्म्य (ऐक्य) करून नंतर उलट प्रकार भासविते. त्यामुळें 'सत्तेचें आकाश' अशा योग्य व्यवहाराबद्दल 'आकाशाची

सत्ता' असा अयोग्य व्यवहार होतो. ॥६३॥

- पण मायेच्या योगानें कार्यात विपरीतपणा कसा येतो तें सांगतात-

सतो व्योमत्वमापन्नं व्योम्न: सत्तां तु लौकिका: ।
तार्किकाश्चावगच्छन्ति मायाया उचितं हि तत् ॥६४

अन्वयार्थ- [मायया सत: व्योमत्वं आपन्नं भवति-] मायेच्या योगानें सद्वस्तूलाच आकाशत्व आलें आहे; [तु लौकिका: तार्किका: च व्योम्न: सत्तां अवगच्छन्ति-] पण लौकिक व तार्किक 'आकाशाची सत्ता' असें समजतात. [तत् मायाया: उचितं हि-] मायेमुळें असें होणें उचितच आहे.

प्रकाश:-- विचारपूर्वक जर पाहिलें, तर मृत्तिकेला जसें घटरूपत्व येतें, तसेंच सद्वस्तूला आकाशत्व आलें आहे, असा निश्चय होतो; पण सर्व व्यावहारिक प्राणी व कणाद, गौतम इत्यादि तर्ककुशल शास्त्रकार 'आकाशाची सत्ता' असा विपरीत प्रकार मानितात; परंतु मायेनें भ्रमिष्ट झालेल्या कोणाचीहि अशी विपरीत भावना होणें साहजिक असल्यामुळें आम्ही त्यांचा हेवा करीत नाहीं. ॥६४॥

-माया विपरीत प्रतीतीला कारण होते, ही गोष्ट लौकिक न्याय प्रदर्शित करून स्पष्ट करितात-

यद्यथा वर्तते तस्य तथात्वं भाति मानत: ।
अन्यथात्वं भ्रमेणेति न्यायोऽयं सार्वलौकिक: ॥६५

अन्वयार्थ- [यत् यथा वर्तते-] जे असें असतें [तस्य तथात्वं मानत: भाति-] त्याचें तद्रूपत्व प्रमाणत: भासते. [अन्यथात्वं तु भ्रमेण-] पण त्याचें जें विपरीत भासणें तें भ्रमानेंच, खरें नव्हे, [इति अयं न्याय: सार्वलौकिक: अस्ति-] असा हा न्याय सर्व लोकप्रसिद्ध आहे.

प्रकाश:- शुक्ति इत्यादि पदार्थ, शुक्ति इत्यादि रूपानें प्रत्ययाला येणें हें प्रमाण व रजतादि रूपानें प्रत्ययाला येणें हें अप्रमाण ज्ञान होय. अप्रमाण ज्ञान भ्रमजन्य असतें. शिंप भ्रमानें चांदी - या रूपानें भासते. अर्थात् ती अप्रमाण होय. तात्पर्य 'सद्वस्तूचें आकाश' असतांना तें तसें न भासतां 'आकाशाची सत्ता' असा भास होणें हा भ्रम आहे. ॥६५॥

-आतां ह्या भ्रमाची निवृत्ति कशी होईल तें सांगतात-

एवं श्रुतिविचारात्प्राग्यथा यद्वस्तु भासते ।
विचारेण विपर्येति ततस्तच्चिन्त्यतां वियत् ॥६६

अन्वयार्थ- [एवं श्रुतिविचारात् प्राक्-] याप्रमाणें श्रुत्यर्थाचा विचार करण्यापूर्वीं [यत् वस्तु यथा भासते-] जी वस्तु जशी भासत असते [तत् विचारेण विपर्येति-] ती श्रुतिविचारानंतर तशीच भासत नाहीं. तर तिच्यांत विचारानें विपर्यास होतो. [तत: तत् वियत् चिन्त्यताम्-] म्हणून त्या आकाशाविषयीं विचार करावा.

प्रकाश:- वेदान्त श्रुतींचा आश्रय करून विचार करीपर्यंत सद्रूप वस्तूचा भ्रांतीनें आकाश असा भास होतो; पण योग्य गुरूपरंपरेनें श्रुतीचा विचार केला असतां तें पूर्वीप्रमाणें न भासतां आकाश हें भ्रामक असून सद्रूप वस्तू सत्य आहे असा दृढ निश्चय होतो. यास्तव तत्त्वज्ञानाकरितां वेदान्ताचा आश्रय करून आकाशाविषयीं व तसेंच सर्व द्वैताविषयीं विवेचन करावें. ॥६६॥

-आता विचाराचें स्वरूप दाखवितात-

भिन्ने वियत्सती शब्दभेदाद्बुद्धेश्च भेदत: ।
वाय्वादिष्वनुवृत्तं सन्न तु व्योमेति भेदधी: ॥६७

अन्वयार्थ- [शब्दभेदात् बुद्धे: च भेदत:-] शब्दांच्या भेदामुळें व बुद्धीच्या भदामुळें [वियत्सती भिन्ने भवत:-] आकाश व सत् हीं भिन्न आहेत. [यत: वाय्वादिषु सत् अनुवृत्तं-] कारण वायु, तेज इत्यादि पुढील कार्यांत सत् अनुवृत्त होतें. [व्योम तु न अनुवृत्तं-] पण व्योम अनुवृत्त होत नाहीं. [इति भेदधी:-] याप्रमाणें भेदबुद्धि होतें.

प्रकाश:-आकाश व सत् असे भिन्न शब्द

असल्यामुळें व ते (शब्द) घट, कलश, कुंभ इत्यादि शब्दांप्रमाणें एकमेकांचें वाचक नसल्यामुळें आकाश व सत् भिन्न आहेत. शिवाय व्योमबुद्धि व सत्बुद्धि यांचा भेद आहे. कारण वायु 'आहे' तेज 'आहे' उदक 'आहे' इत्यादि आकाशाच्या उत्तर कार्यांत 'सत्'ची अनुवृत्ति (अन्वय, संबंध) प्रत्यक्ष भासत असल्यामुळें व वायु आकाश आहे, तेज आकाश आहे इत्यादि तऱ्हेनें सत् प्रमाणेंच आकाशाचें वाय्वादिकांत भान होत नसल्यामुळें आकाश व सत् भिन्न आहेत असा निश्चय होतो. शंका:- वायु, तेज, इत्यादि कार्यांत आकाशाचा शब्द हा गुण अनुवृत्त नाहीं का होत ? समाधान- होय, आकाश हें वायूचे परिणामी उपादान कारण असल्यामुळें वस्त्रामध्यें जसा तंतूंचा रंग अनुवृत्त होतो, त्याप्रमाणें आकाशाचा शब्द हा गुण वाय्वादि कार्यात अनुवृत्त होतो हें खरें, पण आकाशाच्या अवकाशरूपी स्वरूपाची त्यांत अनुवृत्ति होत नाहीं. तंतु हें वस्त्राचें आरंभोपादान असल्यामुळें वस्त्रांत तंतु व त्याचे गुण या उभयतांचीहि अनुवृत्ति होते. पण हें सद्रूप ब्रह्म आकाशादि प्रपंचाचें विवर्तरूप उपादान कारण असल्यामुळें तें त्यांत केवल सत्तारूपानें अनुवत्त होतें. वस्तूचें पूर्वरूप जाऊन त्याला अन्यरूप येणें हा 'परिणाम' होय. उदाहरण-दुधाचें दहीं दह्यांत स्वतःच्या परिणामी उपादान कारणांतील पांढरावर्ण, माधुर्य इत्यादि गुण अनुवृत्त होतात. वस्तूचें स्वरूप न बदलतां त्याला निराळा आकार येणें हा 'आरंभ' होय. उदाहरण-मातीचा घट यांत सर्वत्र मातीच असतांना आकार मात्र निराळा होतो. अशा प्रसंगीं कारणाचे सर्व गुण कार्यात येतात. वस्तू एक असतांना ती भलतीच भासणें हें 'विवर्त' होय. उदाहरण रज्जूच्या ठिकाणीं सर्प. अशा कार्यांत अधिष्ठानाची केवळ सत्ता अनुवृत्त होते. तात्पर्य ह्याप्रमाणें विचार करून सत् व आकाश भिन्न आहेत असा निश्चय करावा. ॥६७॥

-ह्याप्रमाणें आकाश व सत् यांच्या भेदाची सिद्धि करून आतां- 'आकाशाची सत्ता' अशा रीतीनें भ्रांतीनें प्रतीत झालेल्या धर्मिधर्मभावाचा विचारानें बदल कसा होतो तें दाखवितात-

सद्वस्त्वधिकवृत्तित्वाद्धर्मि व्योम्नस्तु धर्मता ।
धिया सत: पृथक्कारे ब्रूहि व्योम किमात्मकम् ॥६८

अन्वयार्थ- [सद्वस्तु अधिकवृत्तित्वात् धर्मि-] सद्वस्तु अधिक जागीं राहणारी म्ह० व्यापक असल्यामुळें धर्मी होय [व्योम्न: तु धर्मता-] व कमी भागांत राहणाऱ्या आकाशाला धर्मता आहे. [धिया सत: पृथक्कारे सति-] आतां विवेकानें आकाशाहून सत्-ला निराळें केलें असतां [व्योम किमात्मकं ब्रूहि-] आकाशाचें स्वरूप काय राहिलें सांग पाहूं ?

प्रकाश:- रूप, रस, गंध इत्यादि अनेक गुणांमध्यें द्रव्य अनुवृत्त असल्यामुळें द्रव्य धर्मी व रूपादि गुण धर्म हा जसा निश्चय होतो त्याचपमाणें आकाशादि अनेक पदार्थामध्यें अनुवृत्त होणारें सत् धर्मि व आकाशादि धर्म होत. आंब्याचें फळ हें द्रव्य असून त्यावर लाल किंवा पिवळा रंग, मधुर रस, उत्तम वास इत्यादि गुण राहतात. पण त्याचा आश्रय आंबाच असल्यामुळें तो प्रत्येकांत असतो. म्हणून तो धर्मी व परस्पर भिन्न असणारे रंगादि धर्म असें व्यवहारांत सर्व समजतात. तात्पर्य सत्हि असेंच असल्यामुळें धर्मी होय व आकाशादिक हे त्याचे धर्म होत. ही गोष्ट सिद्ध झाली. तेव्हां आतां विचारानें अधिक देशांत राहणारें सत् आकाशाहून पृथक् केलें असतां आकाश कोणत्या रूपानें राहतें सांग ? ॥६८॥

-'अहो पण आकाश हा आद्य विकार आहे व तो अवकाशरूप आहे, इत्यादि तुम्हींच त्याचें निरूपण केलें आहे,' म्हणून म्हणाल तर सांगतों-

अवकाशात्मकं तच्चेदसत्तदिति चिन्त्यताम् ।
भिन्नं सतोऽसच्च नेति वक्षि चेद्व्याहतिस्तव ॥६९

अनव्यार्थ- [तत् अवकाशात्मकं चेत्-] ते अवकाशरूप आहे असें जर म्हणशील [तत् असत् इति चिन्त्यताम्-] तर मग तें असत् आहे असें समज.

[सत: भिन्नं असत् च न इति वक्षि चेत्-] 'सत्-हून भिन्न खरें पण असत् नव्हे' असें जर म्हणशील तर [तव व्याहति: स्यात्-] तुझ्या म्हणण्यावर व्याघात हा दोष येईल.

प्रकाश:- आम्ही सांगितलेंच जर तुला मान्य असेल तर तें असत् म्हणजे शून्य आणि म्हणूनच तुच्छ आहे असेंहि तुला आम्हांप्रमाणें मानावें लागेल. आता आकाश हें सत्पेक्षां निराळें आहे खरें पण तें असत् नव्हे असें मात्र म्हणू नकोस. कारण सत्हून विलक्षण असें एक असत्च असणार हें एकादा साधारण मनुष्य सुद्धां कबूल करील. मग असें भलतेंच जर तूं (प्रमाण कुशल) म्हणूं लागलास तर तुला लोक काय म्हणतील? ॥६९॥

-'अहो पण आकाश जर असत् आहे तर तें भासतें कसें?' म्हणून म्हणशील तर सांगतो-

भातीति चेद्भातु नाम भूषणं मायिकस्य तत् ।
यदसद्भासमानं तन्मिथ्या स्वप्नगजादिवत् ॥७०

अन्वयार्थ- [भाति इति चेत्-] 'आकाश भासतें' असें जर म्हणशील [भातु नाम-] तर भासेना; [यत: तत् मायिकस्य भूषणं-] कारण भासणें हें मायिक पदार्थाचें भूषणच आहे. [यत् असत् सत् भासमानं-] जें असत् असून भासणारें [तत् स्वपगजादिवत् मिथ्या-] तें स्वप्नांतील हत्ती, घोडे इत्यादिकांप्रमाणें खोटेंच होय.

प्रकाश:- स्वप्नात आपणाला अनेक पदार्थ दिसतात पण ते असत् असल्यामुळें म्हणजे त्यांचा भास होण्याला योग्य देश, काल, इत्यादि नसल्यामुळें जसे ते सर्व खोटे आहेत असें सर्व मानितात, तसेंच आकाशादिक खरोखरी असत् असतांना भासत असल्यामुळें खोटे आहेत असा विचारी पुरुषाला निश्चय करितां येतो. ॥७०॥

-'अहो पण नियमानें एकत्र राहणाऱ्या पदार्थांत भिन्नता असते असें आम्हीं कोठें पाहिलें नाहीं, म्हणून म्हणाल तर सांगतो-

जातिव्यक्ती देहिदेहौ गुणद्रव्ये यथा पृथक् ।
वियत्सतोस्तथैवास्तु पार्थक्यं कोऽत्र विस्मय: ॥७१

अन्वयार्थ- [जाति-व्यक्ति] जाति व व्यक्ति [देहि-देहौ-] आत्मा व देह [गुण-द्रव्ये] गुण व द्रव्य [यथा पृथक्-] हीं जशीं पृथक् [तथा एव वियत्सतो: पार्थक्यं अस्तु-] तसाच आकाश व सत् यांचा पृथक्पणा असूं दे. [अत्र विस्मय: क: अस्ति-] यांत एवढें आश्चर्य तें काय आहे !

प्रकाश:- गोत्व ही जाति व त्यांतील प्रत्येक व्यक्ति, शरीराचा स्वामी व शरीर आणि द्रव्य व गुण हीं सुद्धां नियमानें एकत्र राहणारीं आहेत. पण असें असून तुम्हीं नैयायिक त्यांचा भेद मानतां ? मग तसाच आकाश व सत् यांचा भेद मानावयास काय हरकत आहे ? ॥७१॥

-त्यांचा भेद असावा असें जरी वाटलें तरी तो निश्चित होत नाहीं, अशी शंका-

बुद्धोऽपि भेदो नो चित्ते निरूढिं याति चेत्तदा ।
अनैकाग्र्यात्संशयाद्वारूढ्यभावोऽस्य ते वद ॥७२

अन्वयार्थ- [भेद: बुद्ध: अपि-] भेद असावासें जरी वाटलें [चित्ते निरूढिं न याति चेत्-] तरी तो चित्तावर आरूढ होत नाहीं म्हणून म्हणशील [तदा ते अस्य रूढ्यभाव: अनैकाग्र्यात् संशयात् वा वद-] तर तो तुझ्या बुद्धीवर आरूढ न होण्याला चित्ताच्या एकाग्रतेचा अभाव हें कारण आहे, कीं तुला अजून कांहीं संशय आहे ? सांग.

प्रकाश:- चित्ताची पूर्ण एकाग्रता झाल्यावांचून हें वेदान्त तत्त्व यथावत् समजत नाहीं. अथवा श्रुतीविषयीं ज्यांना मोठा आदर वाटत नाहीं. त्यांनाहि अनेक संशयामुळें हें तत्त्व समजत नाहीं, हा सर्व प्रकार लक्षांत आणून हा सिद्धान्त तुला न समजण्यास पूर्वोक्त दोन कारणांतील कोणतें कारण आहे तें सांग म्हणजे त्याप्रमाणें उपायांची योजना करूं-असें ग्रंथकार

म्हणतात. ॥७२॥

-दोन्ही पक्षीं उपाय सुचवितात-

अप्रमत्तो भव ध्यानादाद्येऽन्यस्मिन्विवेचनम् ।
कुरु प्रमाणयुक्तिभ्यां ततो रूढतमो भवेत् ॥७३

अन्वयार्थ- [आद्ये-] यांतील प्रथम कारण असेल तर [ध्यानात् अप्रमत्तो भव-] ध्यानाच्या योगानें सावधानचित्त हो. [अन्यस्मिन्-] बरें, द्वितीय कारण असेल तर [प्रमाणयुक्तिभ्यां विवेचनं कुरु-] श्रुतिप्रमाण व तदनुकूल युक्ति यांच्या योगानें सत् व वियत् यांचें विवेचन कर. [ततः रूढतमः भवेत्-] म्हणजे त्यांचा भेद बुद्धीवर अत्यंत आरूढ होईल.

प्रकाशः- चित्त विक्षिप्त असणें हें प्रथम कारण होय. सतत एकाच पदार्थामध्यें चित्ताचा प्रवाह स्थिर करणें हा त्याच्या एकाग्रतेचा उपाय आहे. तसेंच कांहीं संशय असणें हें दुसरें कारण आहे. पण उपनिषद्वाक्यें व गुरूनें सांगितलेली युक्ति यांच्या योगानें आकाश व सत् यांचें पृथक्करण केलें असतां त्याचेंहि निराकरण होतें. सारांश तत्त्वजिज्ञासूकरितां श्रुतीनें सर्व मार्ग सोपा करून ठेविला आहे. पण त्याचें अवलंबन करणें किंवा न करणें ज्याच्या त्याच्या स्वाधीन असतें. ॥७३॥

-त्यामुळें काय होतें ?-

ध्यानान्मानाद्युक्तितोऽपि रूढे भेदे वियत्सतोः ।
न कदाचिद्वियत्सत्यं सद्वस्तु च्छिद्रवन्न च ॥७४

अन्वयार्थ- [ध्यानात् मानात् युक्तितः अपि वियत्सतोः भेदे रूढे सति-] ध्यानानें, प्रमाणानें व युक्तीनेंहि 'आकाश व सत् यांचा भेद आहे' असें एकदा निश्चित झालें कीं [वियत् कदाचित् सत्यं न-] मग आकाश कधींहि सत्य होणार नाहीं [च सद्वस्तु च्छिद्रवत् न भवति-] व सद्वस्तु अवकाशयुक्त कधींहि होणार नाहीं.

प्रकाशः- मनाच्या प्रत्ययाची एकरूपता हें ध्यान, श्रुति किंवा सदुसष्टाव्या श्लोकांत सांगितलेलें 'भिन्ने वियत्सती०' इत्यादि मान-प्रमाण व सद्वस्तु अधिकवृत्त असल्यामुळें धर्मि व आकाश न्यून देशांत रहात असल्यामुळें धर्म इत्यादि पूर्वोक्त युक्ति यांच्या योगानें एकदा तत्त्वाच्या याथात्म्याचा बोध झाला कीं आकाश सत्य आहे किंवा सत् अवकाशरूप आहे असें कधीं स्वप्नातहि वाटणार नाहीं. तात्पर्य हें अबाधित ज्ञान असल्यामुळें सत्य आहे. ॥७४॥

-आकाश व सत् यांच्या विवेचनाचें फल -

ज्ञस्य भाति सदा व्योम निस्तत्त्वोल्लेखपूर्वकम् ।
सद्वस्त्वपि विभात्यस्य निश्छिद्रत्वपुरःसरम् ॥७५

अन्वयार्थ- [ज्ञस्य व्योम सदा निस्तत्त्वोल्लेखपूर्वकम् भाति-] ज्ञानी पुरुषाला आकाश सर्वदा निस्तत्त्वरूप भासतें. [अस्य सद्वस्तु अपि निश्छिद्रत्वपुरःसरं विभाति-] तशीच त्याला सद्वस्तु सुद्धां अवकाशशून्य अशीच भासते.

प्रकाशः- ज्ञान्याला आकाशाकडे पहातांच त्यांत कांहीं तत्त्व नसून तें स्वतःसत्ताशून्य आहे असा स्पष्ट भास होतो व सद्वस्तुविषयीं विचार करूं लागतांच त्यांत अवकाशाचा गंधहि नाहीं, असा त्याला साक्षात् प्रत्यय येतो. ॥७५॥

-याप्रमाणें आकाशाचें मिथ्यात्व व सत्चें सत्यत्व, यांचें सदा चिंतन केल्यानें काय होतें, तें सांगतात-

वासनायां प्रवृद्धायां वियत्सत्यत्ववादिनम् ।
सन्मात्राबोधयुक्तं च दृष्ट्वा विस्मयते बुधः ॥७६

अन्वयार्थ- [वासनायां प्रवृद्धायां सत्यां-] ही वासना वृद्धिंगत झाली असतां [बुधः वियत्सत्यत्ववादिनं सन्मात्राबोधयुक्तं च दृष्ट्वा-] ज्ञानी पुरुष 'आकाश सत्य आहे' असें म्हणणाऱ्या व केवल सद्वस्तूविषयींच्या अज्ञानानें युक्त असलेल्या पुरुषास पाहून [विस्मयते-] विस्मित होतो.

प्रकाश:- वियत् खोटें व सत् सत्य आहे असें पुन: पुन: चिन्तन करून वियत् व सत् यांचा भेद दृढ झाला असतां त्या पुरुषाला तद्विपरीत बोलणाराकडे पाहून हसूं येणें साहजिक आहे. ॥७६॥

-हाच न्याय वाय्वादिकांच्या विवेचनाला लागू करावा, असें सांगतात-

एवमाकाशमिथ्यात्वे सत्सत्यत्वे च वासिते ।
न्यायेनानेन वाय्वादे: सद्वस्तु प्रविविच्यताम् ॥७७

अन्वयार्थ- **[एवं आकाशमिथ्यात्वे-] याप्रमाणें आकाशाचें मिथ्यात्व [सत्सत्यत्वे च-] व सत्चें सत्यत्व [वासिते सति-] याविषयीं भावना दृढ झाली असतां [अनेन न्यायेन वाय्वादे: सद्वस्तु प्रविविच्यताम्-] ह्याच न्यायानें वायु, तेज इत्यादि इतर पदार्थांपासूनहि सद्वस्तूचें विवेचन करावें.**

प्रकाश:- 'आद्यो विकार आकाश०' (६०) येथपासून प्रस्तुत श्लोकापर्यंत आकाशापासून सद्वस्तूचें पृथक्करण कसें करावयाचें तें दाखविलें व आतां ह्याचप्रमाणें पुढेंहि वायु, तेज, उदक, पृथ्वी, स्थावरजंगमात्मक प्राणी इत्यादि यच्चयावत् सृष्टीपासून सद्वस्तूचें पृथक्करण करावें असें येथें ग्रंथकारांनीं सांगितलें आहे. ॥७७॥

-'अहो पण, वायु आकाशाचें कार्य आहे, सद्वस्तूचें नव्हे, तेव्हां कारण नसलेल्या सत्शीं त्याचे तादात्म्य आहे अशी प्रतीति येऊं शकत नाहीं, त्यामुळें वाय्वादिकांपासून सद्वस्तूचें विवेचन करणें व्यर्थ आहे, अशी आशंका घेऊन सांगतात-

सद्वस्तुन्येकदेशस्था माया तत्रैकदेशगम् ।
वियत्तत्रोप्यकदेशगतो वायु: प्रकल्पित: ॥७८

अन्वयार्थ- **[सद्वस्तुनि एकदेशस्था माया कल्पिता-] सद्वस्तूमध्यें त्याच्याच एका भागांत राहणारी माया कल्पिली आहे, [तत्र एकदेशगं वियत् कल्पितम्-] त्याच सद्वस्तूच्या भागाचा आश्रय करून राहणाऱ्या मायेच्या कांहीं भागांत आकाशाची कल्पना केली, [तत्र अपि एकदेशगत: वायु: प्रकल्पित: अस्ति-] आणि आतां सत् व माया यांच्या आश्रयानें कल्पिलेल्या आकाशाच्या कांहीं भागावर वायूची कल्पना केली आहे.**

प्रकाश:- सृष्टि ही मायानिर्मित असल्यामुळें तो सर्व कल्पनेचाच बाजार आहे. ह्यामुळें वस्तुत: जरी तो अनिर्वचनीय आहे तरी व्यवहाराचा निर्वाह होण्याकरितां तो कसा तरी कल्पनामय वाणीनेंच स्पष्ट करून सांगावा लागतो; खरें पाहूं गेलें असतां त्यांत कांहीं अर्थ नसतो, व पुरुषार्थप्राप्तीलाहि त्याचा कांहीं विशेष उपयोग होत नाहीं. परंतु मनुष्याची सहजच चौकस बुद्धि असल्यामुळें व सूक्ष्म तत्त्व एकाएकीं बुद्ध्यारूढ होणें शक्य नसल्यामुळें अशा रीतीनें अनेकश: सृष्टीची उत्पत्ति, तिचा लय, तिची स्थिति इत्यादि प्रकार अध्यात्म ग्रंथांतून वर्णिलेले आढळतात. ॥७८॥

-याप्रमाणें सत् व वायु यांचा परंपरेनें संबंध दाखवून त्यांच्या धर्मत: भेदाचें ज्ञान होण्याकरितां प्रथम वायूमध्यें प्रतीत होणारे धर्म सांगतात-

शोषस्पर्शौ गतिर्वेगो वायुधर्मा इमे मता: ।
त्रय: स्वभावा: सन्मायाव्योम्नां ये तेऽपि वायुगा: ॥७९

अन्वयार्थ- **[शोषस्पर्शौ गति: वेग: इमे वायुधर्मा: मता:-] सुकविणें, स्पर्श, गति व वेग हे वायूचे धर्म मानलेले आहेत.- याप्रमाणें वायूचे स्वाभाविक धर्म सांगून आतां त्याच्या कारणांपासून प्राप्त झालेले धर्म सांगतात- [सन्मायाव्योम्नां ये त्रय: स्वभावा: ते अपि वायुगा: सन्ति-] सत्, माया व आकाश यांचे** जे तीन गुण तेहि वायूमध्यें आहेत.

प्रकाश:- प्रथमार्धातील चार धर्म स्वत: वायूचे आहेत व उत्तरार्धातील तीन धर्म वायूच्या कारणांचे आहेत. नैयायिक स्पर्श हाच एक वायूचा मुख्य धर्म मानितात व तसेंच येथेंहि पूर्वीं सांगितलें आहे पण 'न

शोषयति मारुत:' या वाक्यावरून व ओलें वस्त्र वायूवर पसरलें असतां केवल वायूमुळेंच तें शुष्क होतें असा प्रत्यक्ष अनुभवहि असल्यामुळें शोषण हाहि वायुचा धर्म आहे असें म्हणावें लागतें. तसेंच वायूमुळें अन्य पदार्थ उडून जातात व तो येतो व जातो यावरून गति व वेग हे धर्महि त्याचे आहेत असा निश्चय होतो. तात्पर्य ह सर्व धर्म प्रत्यक्षसिद्ध आहेत. **शंका-** अहो धर्मि जर प्रत्यक्ष नाहीं तर धर्म तरी प्रत्यक्ष कसे असतील ? न्यायमतानें वायु केवल अनुमानगम्य आहे मग शोषस्पर्शादि त्याचे धर्म प्रत्यक्ष आहेत हें तुमचें म्हणणें योग्य कसें होणार ? **समाधान-** असें म्हणूं नको. कारण हें तुमचें म्हणणें अनुभवाच्याविरुद्ध आहे. कारण वायु जर प्रत्यक्ष नसता तर 'माझ्या अंगाला शीतल वायुचा स्पर्श झाला' असा कोणालाच अनुभव आला नसता, पण प्रत्येकाला तसा अनुभव तर प्रतिदिनीं येत आहे. अर्थात् वायु अप्रत्यक्ष हें न्यायमत सर्वानुभवानें बाधित झालें (मिथ्या ठरलें). तात्पर्य वायु व पूर्वोक्त वायुधर्म प्रत्यक्ष आहेत असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ॥७९॥

-सत्, माया व आकाश यांच्यापासून वायूंत कोणते तीन धर्म आले आहेत तें सांगतात-

वायुरस्तीति सद्भाव: सतो वायौ पृथक्कृते ।
निस्तत्त्वरूपता मायास्वभावो व्योमगो ध्वनि: ॥८०

अन्वयार्थ- [वायु: अस्ति इति सद्भाव:-] वायु आहे, असा हा वायूंत सत्‌चा स्वभाव आहे. [वायौ सत: पृथक्कृतं सति-] वायूचें सत्‌हून पृथक्करण केलें असतां [या निस्तत्त्वरूपता स: मायास्वभाव:-] त्याचें जें निस्तत्त्वरूपत्व राहतें तोच मायेचा स्वभाव होय. [तथा व्योमग: ध्वनि: वायौ अस्ति-] त्याचप्रमाणें आकाशस्थ ध्वनि हा गुण वायूंत आहे.

प्रकाश:- 'वायु आहे' अशा व्यवहाराला कारण होणारें जें सद्रूपत्व तो वायुमध्यें सद्वस्तूचा धर्म आहे. विवेकानें वायूला सद्वस्तूहून पृथक् केलें असतां वर श्लो. ६८-६९. - सांगितल्याप्रमाणें वायूचें जें निस्तत्त्वरूपत्व तो मायेचा धर्म आहे व वायूंतील शब्द श्लो. ३-हा आकाशापासून आलेला धर्म आहे याप्रमाणें वायुरूपी कार्यांत त्याच्या तीन कारणांचे तीन स्वभाव आले आहेत ॥८०॥

-'जेव्हां आकाशाचें विवेचन चाललें होतें तेव्हां वाय्वादिकांमध्यें सत्‌ची अनुवृत्ति होते, पण आकाशाची होत नाहीं, असें सांगितलेंत व आतां 'व्योमाची अनुवृत्ति होते' असें पुन: तुम्हींच सांगतां, तेव्हां आतां यांतलें खरें कोणतें ?' अशी शंका-

सतोऽनुवृत्ति: सर्वत्र व्योम्नो नेति पुरेरितम् ।
व्योमानुवृत्तिरधुना कथं न व्याहतं वच: ॥८१

अन्वयार्थ- [सत: सर्वत्र अनुवृत्ति: भवति व्योम्न: न इति पुरा ईरितम्-] सत्‌ची अनुवृत्ति सर्वत्र होते व व्योमाची होत नाहीं. असें पूर्वीं श्लोक. ६७ त सांगितलेंत [अधुना व्योमानुवृत्ति: उच्यते:-] व आतां वायूंत व्योमाची अनुवृत्ति सांगतां [अत: तव वच: कथं न व्याहतम्-] तेव्हां तुमचें म्हणणें व्याहत-परस्पर विरुद्ध असल्यामुळें अप्रमाण-कसें नव्हे ?

प्रकाश:- व्याहति म्हणजे वदतोव्याघात. हा एक दोष आहे. ज्या बोलण्यांतच विरुद्ध अर्थ भासतो तें व्याहत भाषण होय. उदाहरण- 'माझी माता वांझ आहे' किंवा 'मी मुका आहें' इत्यादि वाक्यांवरून बोलणाराची माता वांझ नाहीं व बोलणारा मुका नाहीं ही गोष्ट सिद्ध होत असते. ग्रंथकाराचें वचन असें नसून तें केवल वरवर पहाणाराला पूर्वोक्तविरुद्ध आहे अस वाटण्यासारखें आहे. म्हणून व्याहत म्ह० व्याघात असा मुख्य अर्थ न करितां अप्रमाण असा अर्थ करावा. श्लो.

६७ व ८१ मध्यें परस्पर विरुद्ध विधान आढळतें असा भावार्थ. ॥८१॥

-वर आकाशाच्या अवकाश या स्वरूपाची अनुवृत्ति वाय्वादि कार्यांत होत नाहीं, असें सांगितलें व आतां त्याच्या 'शब्द' या गुणाची अनुवृत्ति सांगत आहों, स्वरूपाची नव्हे, तेव्हां पूर्वोत्तर-विरोध हा दोष कसा येईल, अशा आशयानें शंकेचा परिहार करितात-

छिद्रानुवृत्तिर्नेतीति पूर्वोक्तिरधुना त्वियम् ।
शब्दानुवृत्तिरेवोक्ता वचसो व्याहतिः कुतः ॥८२

अन्वयार्थ- [छिद्रानुवृत्तिः न भवति इति पूर्वोक्तिः-] वाय्वादि कार्यांत आकाशाच्या अवकाशाची अनुवृत्ति होत नाहीं असें वर सांगितलें आहे. [अधुना तु इयं शब्दानुवृत्तिः एव उक्ता-] आणि आतां ही शब्दाची अनुवृत्ति मात्र सांगितली आहे. [तथा च वचसः व्याहतिः कुतः-] तेव्हां वचनाची व्याहति-व्याघात कोठून होणार ?

प्रकाश:- दोन्ही ठिकाणचे प्रसंग निरनिराळे असल्यामुळें व वस्तुतः विरुद्ध गोष्टच कोठें सांगितलेली नसल्यामुळें शंकित दोष येत नाहीं ॥८२॥

-यावर पुनः शंका-

ननु सद्वस्तुपार्थक्यादसत्त्वं चेत्तदा कथम् ।
अव्यक्तमायावैषम्यादमायामयतापि नो ॥८३

अन्वयार्थ- [ननु सद्वस्तुपार्थक्यात् वायोः असत्त्वं चेत्-] अहो पण सद्वस्तूहून पृथक् असल्यामुळेंच जर वायूचें असत्त्व सिद्ध होत असेल [तदा अव्यक्तमायावैषम्यात् अमायामयता अपि कथं नो भवति-] तर मग अव्यक्त जी माया तिच्याशीं वैषम्य पावणाऱ्या वायूच्या अमायामयतेची सुद्धां कां सिद्धि होऊं नये ?

प्रकाश:- माया अव्यक्त आहे व वायु व्यक्त आहे कारण तो स्पष्ट भासतो. अर्थात् माया व मायाकार्य वायु यांत वैषम्य आलें मग सत्शीं वैषम्य पावल्यानें जर तो असत् झाला तर मायेशीं वैषम्य पावल्यामुळें त्यानें अमायिक (सत्य, खरा) ही कां होऊं नये ? असें या शंकेचें तात्पर्य आहे ॥८३॥

-प्रस्तुत शंकेचें समाधान-

निस्तत्त्वरूपतैवात्र मायात्वस्य प्रयोजिका ।
सा शक्तिकार्ययोस्तुल्या व्यक्ताव्यक्तत्व भेदिनोः ॥८४

अन्वयार्थ- [अत्र निस्तत्त्वरूपता एव मायात्वस्य प्रयोजिका अस्ति-] या ठिकाणीं निस्तत्त्वरूपत्व हेंच मायात्वाचें निमित्त आहे [सा तु व्यक्ताव्यक्तत्वभेदिनोः मायाकार्ययोः तुल्या-] व तें अव्यक्त व व्यक्त या भेदांनीं युक्त असणाऱ्या माया व मायाकार्य यांमध्यें सारखेंच आहे.

प्रकाश:- जें जें अव्यक्त तें तें मायामय असें जर आम्हीं म्हणालों, तर ही तुझी शंका योग्य झाली असती. पण निस्तत्त्वरूपत्व मायामयत्वाचा हेतु असल्यामुळे म्ह० मायादि सर्व निस्तत्त्वरूप असल्यामुळें वरील शंका निरुपयोगी आहे. सारांश अशी मूळ माया व व्यक्त अशीं तिचीं आकाशादि कार्यें ह्या दोन्ही स्थळीं निस्तत्त्वरूपता हेतु सारखाच असल्यामुळें आमचा पूर्वोक्त सिद्धान्त अबाधित आहे ॥८४॥

-'अहो पण, शक्ति व कार्य या दोहोंमध्येंहि निस्तत्त्वरूपता हा धर्म जर सारखाच आहे तर त्यांत व्यक्त व अव्यक्त असा भेद कां व्हावा ?' उत्तर-

सदसत्त्वविवेकस्य प्रस्तुतत्वात्स चिन्त्यताम् ।
असतोऽवान्तरो भेद आस्तां तच्चिन्तयात्र किम् ॥८५

अन्वयार्थ- [सदसत्त्वविवेकस्य प्रस्तुतत्वात् सःएव चिन्त्यताम्-] सत्त्व व असत्त्व यांच्या विवेकाला आरंभ केलेला असल्यामुळें त्याचाच विचार करूं या [असतः अवान्तरः भेदः आस्तां-] असत्चा अवान्वर भेद राहूं दे [अत्र तच्चिन्तया किं

स्यात्-] येथें त्याचा विचार करून काय करावयाचें आहे ?

प्रकाश:- ह्या प्रकरणाच्या प्रथम श्लोकांत ग्रंथकारांनीं 'पंचभूतांच्या विवेकानेंच अद्वैत सत् जाणणें शक्य आहे' इत्यादि प्रतिज्ञा केली आहे. व तिच्याशीं विरुद्ध अशा विचाराला या प्रकरणांत स्थल न देण्याकरितांच वरील विचार त्यांनीं एकीकडे लोटिला आहे; नाहींपेक्षां माया जरी प्रथमत: म्हणजे कारणावस्थेंत असेपर्यंत अव्यक्त होती तरी ती कार्यरूपानें परिणत होतांना व्यक्त होणें साहजिक आहे असें त्यांना उत्तर देतां आलें असतें. असो-तात्पर्य वस्तूच्या पोटभेदाची चिकित्सा करण्यांत कांहीं विशेष लाभ नसल्यामुळें त्याचा येथें विचार करणें व्यर्थ आहे ॥८५॥

-सारांश-

सद्वस्तु ब्रह्म शिष्टोऽशो वायुर्मिथ्या यथा वियत्।
वासयित्वा चिरं वायोर्मिथ्यात्वं मरुतं त्यजेत् ॥८६

अन्वयार्थ- [सद्वस्तु ब्रह्म-] वायूंत असणारा जो सत्चा अंश तें ब्रह्म आहे [यथा वियत् तथा शिष्ट: अंश: वायु: मिथ्या-] आणि जसें आकाश तसा तदितर अवशिष्ट राहिलेला जो भाग वायु तो निस्तत्त्वरूप असल्यामुळं मिथ्या आहे. [एवं वायो: मिथ्यात्वं चिरं वासयित्वा मरुतं त्यजेत्-] याप्रमाणें वायूच्या मिथ्यात्वाची भावना दृढ करून वायूला टाकावें.

-तेजाचेंहि असेंच विवेचन करावें, असें आतां सांगतात-

चिन्तयेद्वह्निमप्येवं मरुतो न्यूनवर्तिनम् ।
ब्रह्माण्डावरणेष्वेषा न्यूयाधिकविचारणा ॥८७

अन्वयार्थ- [मरुत: न्यूनवर्तिनं वह्निं अपि एवं चिन्तयेत्-] वायूच्या कांहीं भागांत राहणाऱ्या अग्नीविषयींहि असाच विचार करावा. [एषा न्यूनाधिकविचारणा ब्रह्माण्डावरणेषु सर्वत्र अस्ति-] ही न्यूनाधिक विचारणा ह्या ब्रह्माण्डवारणांमध्यें सर्व ठिकाणीं अशीच आहे.

प्रकाश:- सत्च्या एकदेशांत जशी माया, मायेच्या एकदेशीं जसें आकाश, आकाशाच्या एका भागीं जसा वायु तसाच वायूच्या एका भागांत वह्नि राहतो. तात्पर्य कारण अधिक वृत्ति व कार्य न्यून वृत्ति हा प्रकार ह्या ब्रह्मांडांत सर्वत्र असाच अव्याहत चालू आहे. ॥८७॥

-वायूपेक्षां अग्नि किती अंशांनीं न्यून आहे, हें आतां येथें सांगतात-

वायोर्दशांशतो न्यूनो वह्निर्वायौ प्रकल्पित: ।
पुराणोक्तं तारतम्यं दशांशैर्भूतपञ्चके ॥८८॥

अन्वयार्थ- [वह्नि: वायौ वायो: दशांशत: न्यून: प्रकल्पित: अस्ति-] अग्नि वायूमध्यें वायूहून दहा अंशांनीं न्यून कल्पिलेला आहे. [भूतपंचके इदं दशांशै: तारतम्यं पुराणोक्तं अस्ति-] पांचहि भूतांविषयींचें हें दशांशत: तारतम्य पुराणांत सांगितलें आहे.

प्रकाश:- प्रकल्पित:- या पदानें यच्चयावत् सृष्टि रज्जुसर्पाप्रमाणें कल्पित असून त्यांत सत्याचा अंशहि नाहीं असें सुचविलें आहे. परंतु, असें आहे तरी, ह्या सर्वाच्या अनुभवास येणाऱ्या सृष्टीचें कसें तरी प्रतिपादन करून सृष्टीकडे पहाणाऱ्या अज्ञानी लोकांची समजूत घालण्याकरितां ह्या सर्व कल्पना केल्या आहेत असें समजावें. या सृष्टीच्या प्रतिपादनापासून कांहीं फळ मिळेल अशी यत्किंचिहि आशा करूं नये. ह्या प्रतिपादनाला भागवतादि पुरणांचा आधार आहे, असें ग्रंथकारांनीं येथें स्पष्टपणें सांगितलें आहे. ॥८८॥

-या श्लोकांत अग्नीचें स्वरूप सांगतात-

वह्निरुष्ण: प्रकाशात्मा पूर्वानुगतिरत्र च ।
अस्ति वह्नि: स निस्तत्त्व: शब्दवान्
स्पर्शवानपि ॥८९

अन्वयार्थ- [वह्नि: उष्ण प्रकाशात्मा च

अस्ति-] अग्नि उष्ण व प्रकाशरूप आहे. [अत्र च पूर्वानुगतिः अपि भवति-] व त्यांत कारणगुणांचीहि अनुवृत्ति होते. [अस्ति वह्निः-] कशी ती पहा- वह्नि आहे, [सः निस्तत्त्वः शब्दवान् स्पर्शवान् अपि-] तो निस्तत्त्व, शब्दवान् व स्पर्शवान् सुद्धां आहे.

प्रकाश:- उष्णता व प्रकाश हे अग्नीचे स्वरूपभूत धर्म असून इतर चार त्याच्या कारणाचे आहेत हें सुज्ञांच्या लक्षांत आलेंच असेल ॥८९॥

-अग्नीमध्यें त्याच्या कारणांच्या धर्मांची अनुवृत्ति होते, असें म्हणून त्याचा स्वकीय धर्महि सांगतात-

सन्मायाव्योमवाय्वंशैर्युक्तस्याग्नेर्निजो गुणः ।
रूपं तत्र सतः सर्वमन्यद्बुद्ध्या विविच्यताम् ॥९०

अन्वयार्थ- [सन्मायाव्योमवाय्वंशैः युक्तस्य अग्नेः निजः गुणः रूपं अस्ति-] सत्, माया, आकाश व वायु यांच्या अंशांनीं युक्त असलेल्या अग्नीचा स्वाभाविक गुण रूप हा आहे. याप्रमाणें विशेषणांसह अग्नीचें स्वरूप सांगून सद्वस्तूपासून त्याचें विवेचन करावें, असें सांगतात- [तत्र अपि सतः अन्यत् सर्वं बुद्ध्या विविच्यताम्-] त्यांतूनहि सत्हून भिन्न असलेल्या सर्वांचें विवेकबुद्धीनें पृथक्करण करावें.

प्रकाश:- पूर्वोक्त पद्धतीनेंच अग्नीच्या अनेक गुणांतून मोठ्या कुशलपणानें सद्रूपवस्तु पृथक् करावी. व तद्भिन्न बाकी सर्व धर्म मिथ्या आहेत असा निश्चय करावा. ॥९०॥

-आतां अग्नीप्रमाणेंच उदकाची कल्पना करावी, असें सांगतात-

सतो विवेचिते वह्नौ मिथ्यात्वे सति वासिते ।
आपो दशांशतो न्यूनाः कल्पिता इति चिन्तयेत् ॥९१

अन्वयार्थ- [एवं सतः वह्नौ विवेचिते-] याप्रमाणें सत्पासून वह्नीचें पृथक्करण केलें असतां [तस्य मिथ्यात्वे च वासिते सति-] व त्याच्या मिथ्यात्वाविषयीं दृढ भावना केली असतां [तत्र दशांशतः न्यूनाः आपः कल्पिताः इति चिन्तयेत्-] त्याच्या ठिकाणीं दशांशांनीं न्यून असें उदक कल्पिलें आहे, अशी भावना करावी.

-उदकाचेहि कारणधर्म कोणते व स्वधर्म कोणता, तें सांगतात-

सन्त्यापोऽमूः शून्यतत्त्वाः सशब्दस्पर्शसंयुताः ।
रूपवत्योऽन्यधर्मानुवृत्त्या स्वीयो रसो गुणः ९२

अन्वयार्थ- [अन्यधर्मानुवृत्त्या आपः सन्ति-] उदकाच्या कारणधर्मामुळें उदक आहे, [अमूः शून्यतत्त्वाः सशब्दस्पर्शसंयुताः च रूपवत्यः सन्ति-] तें शून्यरूप, शब्द व स्पर्श यांनीं युक्त व रूपवान् आहे, [परं च आसां स्वीयः गुणः रसः अस्ति-] व त्याचा स्वकीय गुण 'रस' हा आहे.

-आतां पृथ्वीची कल्पना करण्यास सुचवितात-

सतो विवेचितास्वप्सु तन्मिथ्यात्वे च वासिते ।
भूमिर्दशांशतो न्यूना कल्पिताप्स्विति चिन्तयेत् ॥९३

अन्वयार्थ- [सतः अप्सु विवेचितासु सत्सु तन्मिथ्यात्वे च वासिते सति-] सत्हून उदक पृथक् केलें असतां व त्याच्या मिथ्यात्वाविषयीं वासना दृढ झाली असतां. [अप्सु दशांशतः न्यूना भूमिः कल्पिता इति चिन्तयेत्-] उदकांमध्यें त्याहून दशांश न्यून भूमीची कल्पना केली आहे अशी भावना करावी.

प्रकाश:- तात्पर्य पार्थिव ब्रह्मांडापेक्षा त्याला आच्छादून राहणारें उदक दहापट अधिक, त्यापेक्षां तेज दहापट अधिक, तेजापेक्षां वायु दहापट अधिक, वायूपेक्षां आकाश दहापट अधिक, असा यांच्या अधिकत्वाविषयीं निर्णय समजावा. ॥९१ ते ९३॥

-भूमि मिथ्या आहे अशी भावना करितां यावी म्हणून तिच्या धर्माचा विभाग सांगतात-

अस्ति भूस्तत्त्वशून्यास्यां शब्दस्पर्शौ सरूपकौ ।

रसश्चपरतो गन्धौ नैजः सत्ता विविच्यताम् ॥९४

अन्वयार्थ- [भूः अस्ति-] भूमि आहे, [सा तत्त्वशून्या-] ती तत्त्वशून्य आहे. [अस्यां सरूपकौ शब्द-स्पर्शौ तथा रसः च परतः अस्ति-] तिच्यांत रूपासह शब्द व स्पर्श आणि रस हे परतः गुण येतात. [गंधः तु नैजः-] पण गंध हा तिचा स्वकीय गुण आहे. [ततः सत्ता विविच्यताम्-] त्या सर्वांपासून सत्तेचें पृथक्करण करावें.

-आतां भौतिक ब्रह्मांडादिकांपासून सत्चें विवेचन करण्यासाठीं त्यांच्या स्थितीचा प्रकार दाखवितात-

पृथक्कृतायां सत्तायां भूमिर्मिथ्याऽवशिष्यते ।
भूमेर्दशांशतो न्यूनं ब्रह्माण्डं भूमिमध्यगम् ॥९५

अन्वयार्थ- [सत्तायां पृथक्कृतायां सत्यां-] ह्याप्रमाणें भूमीच्या सर्व धर्मापासून सत्ता पृथक् केली असतां [मिथ्या भूमिः अवशिष्यते-] मिथ्या भूमि मात्र अवशिष्ट रहाते. [भूमिमध्यगं भूमेः दशांशतः न्यूनं ब्रह्माण्डं अस्ति-] ह्या भूमीच्या मध्यभागीं भूमीहून दशांशांनीं न्यून असें ब्रह्माण्ड आहे.

-आणि नंतर-

ब्रह्माण्डमध्ये तिष्ठन्ति भुवनानि चतुर्दश ।
भुवनेषु वसन्त्येषु प्राणिदेहा यथायथम् ॥९६

अन्वयार्थ- [ब्रह्माण्डमध्ये चतुर्दश भुवनानि तिष्ठन्ति-] ब्रह्माण्डामध्ये भूः, भुवः इत्यादि सप्त ऊर्ध्व लोक व तल-अतल इत्यादि सप्त अधो लोक रहातात. [एषु भुवनेषु प्राणिदेहाः यथायथं वसन्ति-] ह्या चवदा लोकांमध्यें असंख्य प्राण्यांचे देह शास्त्रव्यवस्थेप्रमाणें रहातात.

प्रकाशः- ह्या भुवनांचीं क्रमवार नांवें प्रथम प्रकरणांतील एका श्लोकाच्या व्याख्यानांत दिलेलीं आहेत, तीं पहावीं. यथायथम् ह्याचा अर्थ अच्युतरायांनीं- शास्त्रव्यवस्थेचा अतिक्रम न करितां असा केला आहे. व तो उत्तम व योग्य असल्यामुळें या प्रसंगीं आम्हीं त्याचा अंगीकार केला आहे. ॥९४ ते ९६॥

-ब्रह्मांडादिकांपासून सत्चें विवेचन केलें असतां काय निष्पन्न होतें तें सांगतात-

ब्रह्माण्डलोकदेहेषु सद्वस्तुनि पृथक्कृते ।
असन्तोऽण्डादयो भान्तु तद्भानेऽपीह का क्षतिः ॥९७

अन्वयार्थ- [ब्रह्माण्डलोकदेहेषु सद्वस्तुनि पृथक्कृते-] ब्रह्माण्ड, सर्वलोक व चतुर्विध देह, यांपासून त्रिकालाबाधित सद्वस्तु पृथक् केली असतां त्यानंतर [असन्तः अण्डादयः भान्तु-] असद्रूप जे ब्रह्माण्डादि पदार्थ ते खुशाल भासोत. [तद्भाने अपि इह का क्षतिः-] ते भासले तरी त्यापासून काय हानि आहे ? (कांहींच नाहीं.)

-'त्यांचे भान जरी झालें तरी त्यांत कोणती हानि आहे ?' हेंच अधिक स्पष्ट करितात-

भूतभौतिकमायानामसत्त्वेत्यन्तवासिते ।
सद्वस्त्वद्वैतमित्येषा धीर्विपर्येति न क्वचित् ॥९८

अन्वयार्थ- [भूत-भौतिक-मायानां असत्वे अत्यन्तवासिते सति-] भूत, भौतिक व माया यांचें असत्त्व एकदा निश्चित होऊन तें अत्यंत दृढ झालें कीं मग [सद्वस्तु अद्वैतं इत्येषा धीः क्वचित् अपि न विपर्येति-] सद्वस्तु अखण्ड-त्रिविध भेदशून्य आहे ही समजूत कधींहि बदलत नाहीं.

प्रकाशः- भूत-आकाशादि. भौतिक-आकाशादि भूतांचीं ब्रह्माण्डादि कार्यें व माया-मूळप्रकृति, अविद्या इत्यादि. यांचें मिथ्यात्व विवेक व ध्यान यांच्या योगानें मनांत दृढ झालें असतां 'सद्वस्तु अद्वैत आहे' ही बुद्धि केव्हांहि जात नाहीं. ॥९७-९८॥

-'अहो पण भूम्यादि पदार्थ असत्-मिथ्या आहेत असें जर मानलें तर मग प्राण्यांच्या व्यवहाराचा लोप होण्याचा प्रसंग येईल !' अशी आशंका घेऊन सांगतात-

सदद्वैतात्पृथग्भूते द्वैते भूम्यादिरूपिणि ।

तत्तदर्थक्रिया लोके यथा दृष्टा तथैव सा ॥९९

अन्वयार्थ- [भूम्यादिरूपिणि द्वैते सदद्वैतात् पृथग्भूते सति-] भूमि, आप इत्यादिरूप द्वैत सद्रूप अद्वैताहून पृथक् आहे असें एकदा निश्चित झालें असतां [लोके तत्तदर्थक्रिया यथा दृष्टा तथा एव सा भविष्यति-] व्यवहारांत त्या त्या पदार्थाच्या योगानें होणारें कार्य पूर्वी जसें होत होतें तसेंच तें पुढेंहि होईल.

प्रकाश:- सारांश आत्माच एक सत्य आहे व तदितर सर्व मिथ्या आहे असें ज्ञान होणें हें परम पुरुषार्थाचें साधन असल्यामुळें तें संपादन करून घेण्याविषयीं मात्र वेदान्ताचा आग्रह आहे. असें ज्ञान झालें असतां सर्व व्यवहाराचा लोपच झाला पाहिजे असें त्याचें म्हणणें नाहीं व तसें होणें शक्यहि नाहीं. कारण एका मनुष्यानें 'हें सर्व जग मिथ्या आहे' असें म्हणतांच जर त्याचा नाश होऊं लागेल तर प्रत्येक साधकाच्या असल्या ज्ञानाबरोबर ह्या सर्व सृष्टींत अकल्पित फेरफार होईल आणि त्यामुळें असंख्य प्राण्यांचा व्यवहार एकाद्या साधकावर अवलंबून आहे, असें होऊं लागेल. पण तसें होणें शक्य व इष्ट नसल्यामुळें ह्या प्राकृतदृष्ट्या परम सत्यरूप भासणाऱ्या जगाला मिथ्या मानून तें केवल व्यवहारावस्थेंत मात्र सत्य आहे अशी त्याविषयीं भावना करा असें वेदान्ताचें सांगणें आहे. ॥९९॥

'-सत्तत्व जर अद्वैतरूप-त्रिविधभेदशून्य-आहे तर सांख्यादिकांच्या भेदाचें तुम्ही निरसन कां करीत नाहीं ?' समाधान-

सांख्यकाणादबौद्धाद्यैर्जगद्भेदो यथा यथा ।
उत्प्रेक्ष्यतेऽनेकयुक्त्या भवत्वेष तथा तथा ॥१००

अन्वयार्थ- [अनेकयुक्त्या सांख्यकाणाद-बौद्धाद्यै:-] **अनेक युक्तींनीं सांख्यशास्त्रकार, वैशेषिक** शास्त्रकार, नास्तिक बुद्ध इत्यादि वादी [जगद्भेद: **यथा यथा** उत्प्रेक्ष्यते-] जगाचा भेद जसा जसा कल्पितात [एष: तथा तथा एव भवतु-] तो तसा तसाच असूं दे.

प्रकाश:- सांख्यादिकांच्या ह्या सर्व खोट्या द्वैताविषयींच्याच कल्पना असल्यामुळें आम्ही त्यांविषयीं त्यांच्याशीं भांडत बसून आपल्या स्वरूपशांतीचा भंग करूं इच्छित नाहीं. शिवाय व्यवहारापुरतें हें द्वैत खरें आहे असें वेदान्तालाहि मान्य असल्यामुळें व्यवहारदृष्ट्या त्यांचें म्हणणें आम्हांला फारसें बाधक नाहीं. ॥१००॥

-'अहो पण प्रमाणांनीं सिद्ध होणाऱ्या सत्त्वाच्या भेदाची अवज्ञा करणें योग्य नव्हे' अशी आशंका घेऊन सांगतात-

अवज्ञातं सदद्वैतं नि:शंकैरन्यवादिभि: ।
एवं का क्षतिरस्माकं तद्द्वैतमवजानताम् ॥१०१

अन्वयार्थ- [तै: नि:शंकै: अन्यवादिभि: सदद्वैतं अवज्ञातं-] त्या नि:शंक अशा दुसऱ्या वाद्यांनीं अद्वैत सद्वस्तूची अवज्ञा केलेली आहे [एवं तद्द्वैतं अवजानतां अस्माकं का क्षति:-] त्याच न्यायानें त्यांच्या द्वैताची अवज्ञा करणाऱ्या आमची काय हानि आहे ?

प्रकाश:- 'जशास तसें' असा व्यवहार आहे. सर्व प्रमाणसिद्ध असें वेदान्तोक्त अद्वैत तत्त्व जर ते महा अभिमानी वादी मानीत नाहींत तर त्यांचें तुच्छ व अविद्यावस्थ द्वैत तरी आम्हीं कां मानावें ? फार काय पण सर्व प्रमाणांत श्रेष्ठ असा जो अनुभव त्यानें सिद्ध होणारें हें अद्वैत जर ते नि:शंकपणें अमान्य करितात तर स्वसिद्धान्ताविषयीं पूर्ण निश्चित झालेल्या आम्हांला तरी त्यांची एवढी भीड हवी कशाला ? ॥१०१॥

-'पण ही तुमची द्वैतावज्ञा व्यर्थ आहे' म्हणून म्हणाल तर सांगतों-

द्वैतावज्ञा सुस्थिता चेदद्वैते धी: स्थिरा भवेत् ।
स्थैर्ये तस्या: पुमानेष जीवन्मुक्त इतीर्यते ॥१०२

अन्वयार्थ- [द्वैतावज्ञा सुस्थिता चेत् स्यात्-] द्वैताविषयीं अवज्ञा जर दृढ झाली [तर्हि अद्वैते धीः स्थिरा भवेत्-] तरच अद्वैतांत बुद्धि स्थिर होईल [तस्याः स्थैर्ये एषः पुमान् जीवन्मुक्तः इति ईर्यते-] आणि अद्वैताविषयीं बुद्धि स्थिर झाली कीं, त्या पुरुषाला जीवन्मुक्त असें म्हणतात.

प्रकाश:- द्वैत तुच्छ आहे, निरुपयोगी आहे इत्यादि द्वैताविषयीं मनांत तिरस्कार उत्पन्न झाल्यावांचून अद्वैताचा निश्चय होत नाहीं. यास्तव साधकानें प्रयत्नपूर्वक द्वैताचा तिरस्कार करावा. त्यानंतर अद्वैत साक्षात्कार होतो. आणि असा साक्षात्कार झाला कीं, त्या साक्षात्कारवान् पुरुषाला 'हा जीवन्मुक्त आहे' असें लोक म्हणूं लागतात. कारण, आत्मसाक्षात्कारानें तृप्त झालेल्या साधकाचे ठिकाणीं तृष्णाक्षय, समसुखदुःखत्व, समलोष्टाश्मकांचनत्व व विगतभीतित्व, इत्यादि सिद्धार्ची लक्षणें स्पष्टपणें दिसूं लागतात ॥१०२॥

-अद्वैत साक्षात्काराचें जीवन्मुक्ति हेंच एक फल आहे असें नाहीं तर पुढें त्यामुळें विदेह कैवल्यहि प्राप्त होतें' असें सांगण्याकरितां भगवद्वाक्याचा अनुवाद करितात-

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वाऽस्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाण-
मृच्छति ॥१०३

अन्वयार्थ- हे पार्थ एषा ब्राह्मी स्थितिः अस्ति- हे अर्जुना, ही अद्वैत ब्रह्मात्मैक्यसंबंधी स्थिति आहे. [एनां प्राप्य न कश्चित् विमुह्यति-] ही स्थिति ज्याला प्राप्त झाली आहे असा कोणीहि मनुष्य तुझ्यासारखा मोहित होत नाहीं. [अंतकाले अपि अस्यां स्थित्वा ब्रह्मनिर्वाणं ऋच्छति-] अन्तकालीं जरी ही स्थिति प्राप्त झाली तरी त्याला ब्रह्मनिर्वाण मिळतें.

प्रकाश:- (भ. गी. २-७२) अंतकाल शब्दाचा अर्थ पुढच्या श्लोकांत ग्रंथकारांनींच सांगितला आहे. ब्रह्मनिर्वाण म्ह० सर्व स्थूल व सूक्ष्म देहाचीं तत्त्वें स्वस्वकारणांत लीन झाल्यावर आत्मज्योती ब्रह्मज्योतींत मिळणें. हाच परपुरुषार्थ व मोक्ष होय; तो केवल आत्मसाक्षात्कारानेंच प्राप्त होत असतो. ॥१०३॥

-'अंतकाल म्हणजे मरणकाल' हा प्रसिद्ध अर्थच येथें विवक्षित आहे असें कोणी म्हणेल म्हणून म्हणतात-

सदद्वैतेऽनृतद्वैते यदन्योन्यैक्यवीक्षणम् ।
तस्यान्तकालस्तद्भेदबुद्धिरेव न चेतरः ॥१०४

अन्वयार्थ- [सदद्वैते अनृतद्वैते च यत् अन्योन्यैक्यवीक्षणं-] सद्रूप अद्वैत व मिथ्यारूप द्वैत यांविषयीं जी परस्पर ऐक्यदृष्टि [तस्य अंतकालः तद्भेदबुद्धिः एवं-] तिचा अंतकाल म्हणजे त्यांच्या विषयींची भेदबुद्धिच होय [च कश्चित् इतरः न अस्ति-] अन्य कांहीं एक नव्हे.

प्रकाश:- अंतकाल शब्दाचा प्रसिद्ध अर्थ सोडून असा अप्रसिद्ध अर्थ करण्याचें कारण असें आहे कीं, - मरणकालीं जर ही बुद्धिस्थिरता राहिली तर विदेहमुक्ति मिळणार आणि सर्व जन्मभर जीवनमुक्त असूनहि जर अंतकाळीं बुद्धि चंचल झाली, तर पूर्व सर्व प्रयत्न व्यर्थ होणार- अशी शंका कोणाला येऊं नये, म्हणून, अंतकाल म्हणजे भ्रमावस्थेचा अंत असा अर्थ करावा. म्हणजे वरील शंका रहाणार नाहीं असें स्वामीजी सुचवितात. ब्रह्मज्ञानापूर्वी परम सत्य जें अद्वैत त्याचें व व्यावहारिक सत्य जें हें सर्व द्वैत, त्याचें अनादि अज्ञानानें ऐक्य भासत असतें. पण तें ब्रह्मात्मज्ञानानें नष्ट होऊन तीं दोन्ही प्रकाश व अंधार यांच्या प्रमाणें परस्पर भिन्न आहेत असें निःसंशय वाटणें हाच 'अंतकाल' होय. ह्या अंतकालाला पोचलेला मनुष्य पूर्वीप्रमाणें मोहित होत नाहीं. ॥१०४॥

-अथवा 'अंतकाल-' शब्दाचा भाष्यकारांना अनुसरून प्रसिद्ध अर्थ जरी केला, तरी सिद्धान्ताला बाध येत नाहीं; असें आतां सांगतात-

यद्वान्तकाल: प्राणस्य वियोगोऽस्तु प्रसिद्धित: ।
तस्मिन् कालेऽपि न भ्रान्तेर्गताया:
पुनरागम: ।।१०५

अन्वयार्थ- [यद्वा प्रसिद्धित: प्राणस्य वियोग: अंतकाल: अस्तु-] किंवा लोकप्रसिद्धीमुळें प्राणाचा वियोग हाच अंतकाल असो. [तस्मिन् काले अपि गताया: भ्रान्ते: पुनरागम: न भविष्यति-] त्या कालीं सुद्धां एकदा गेलेली भ्रान्ति पुन: होणार नाहीं.

प्रकाश:- मरणकाल जरी प्राप्त झाला तरीसुद्धां द्वैतावज्ञापूर्वक निश्चित झालेला अद्वैत सिद्धान्त कधीहि फिरावयाचा नाहीं. असें सांगण्याचें कारण असें कीं, अन्त्य कालीं आध्यात्मिक दु:खादिकांच्या योगानें प्राणी मरणोत्पादक क्लेश सहन करण्यास असमर्थ होतो. आणि त्यामुळें त्याला वरचेवर मूर्च्छा येते, तो अत्यंत कष्टी होतो, व आतां प्राण जाईल तर बरें असें त्याला होऊन जातें. तेव्हां अशा वेळीं अन्य सर्व गोष्टींबरोबर अद्वैत सिद्धान्त विसरणेंहि अशक्य नाहीं. असें कोणी म्हणेल, म्हणून त्याचें येथें स्पष्टपणें निरसन केलें आहे. तात्पर्य मरणकालीं ब्रह्मसाक्षात्कारवान् पुरुषाला कितीहि जरी क्लेश झाले व त्यावर कशाहि जरी आपत्ति आल्या तरी तो मरणोत्तर विदेहमुक्तच होतो. ।।१०५।।

-हाच अर्थ अधिक विस्तारानें सांगतात-

नीरोग उपविष्टो वा रुग्णो वा विलुठन् भुवि ।
मूर्च्छितो वा त्यजत्वेष प्राणान्भ्रान्तिर्नसर्वथा ।।१०६

अन्वयार्थ- [एष: नीरोग: उपविष्ट: वा रुग्ण: वा भुवि विलुठन् वा मूर्छित: वा-] हा साधक नीरोगी असतांना, बसलेला असतांना, रोगी असतांना, क्लेशांनीं जमिनीवर गडबड लोळत असतांना, किंवा मूर्च्छित असतांना सुद्धां [प्राणान् त्यजतु भ्रान्ति: सर्वथा न पुन: भवति-] जरी मृत झाला तरी त्याला द्वैतविषयक भ्रांति पुन: कधींहि होत नाहीं.

प्रकाश:- प्राण्याला मृत्यु हा पूर्व सुकृतदुष्कृतजन्य प्रारब्धाप्रमाणें चांगल्या किंवा वाईट रीतीनें येत असतो. तो झाला, तरी त्यामुळें ब्रह्मज्ञानजन्य मुक्तीला कधींच बाध येत नाहीं, म्हणून साधकानें आपल्या प्रारब्ध भोगांकडे विशेष लक्ष न देतां अमृतरुपी गोड फळ मिळविण्याकडेच दृष्टि ठेवून त्याविषयीं दीर्घ प्रयत्न करीत असावें ।।१०६।।

-'अहो पण प्राणवियोगकालीं मूर्च्छादिकारणानें ज्ञानाचा नाश झाला असतांना पुन: भ्रान्ति होणारच,' अशी आशंका घेऊन सांगतात-

दिने दिने स्वपसुप्त्योरधीते विस्मृतेऽप्ययम् ।
परेद्युर्नानधीत: स्यात्तद्वद्विद्या न नश्यति ।।१०७

अन्वयार्थ- [दिने दिने स्वपसुप्त्यो: अधीते विस्मृते अपि-] प्रतिदिनीं स्वप व निद्रा या अवस्थांमध्यें अध्ययन केलेलें सर्व जरी विसरला तरी [अयं परेद्यु: अनधीत: न स्यात्-] हा दुसऱ्या दिवशीं अनधीत-अध्ययन न केलेला असा होत नाहीं. [तद्वत् विद्या न नश्यति-] त्याचप्रमाणें मृत होण्यापूर्वी प्राप्त होणाऱ्या मूर्च्छेत विसरलेली विद्या नष्ट होत नाहीं.

प्रकाश:- एकादा महापंडित सुद्धां स्वप्न व निद्रावस्थेंत असतांना पूर्वीचें सर्व अध्ययन विसरतो. पण जाग्रतींत येतांत तें त्याला पूर्ववत् सर्व आठवतें असें आपण नेहमीं पाहतों. तसेंच साक्षात्कारानें प्राप्त झालेलें आत्मज्ञान मरणकालिक क्लेशामुळें प्राप्त होणाऱ्या मूर्च्छेंत जरी लीन झालेलें असलें तरी त्याचा सर्वथैव नाश न होतां देहसंबंध सुटतांच विदेह मुक्ति देण्यास तें समर्थ होतें. ।।१०७।।

-ज्ञानाचा नाश होत नाहीं, या सिद्धान्ताचेंच उपपादन-

प्रमाणोत्पादिता विद्या प्रमाणं प्रबलं विना ।
न नश्यति न वेदान्तात्प्रबलं मानमीक्ष्यते ।।०८

अन्वयार्थ- [प्रमाणोत्पादिता विद्या-] प्रमाणानें उत्पन्न झालेलें ज्ञान [प्रबलं प्रमाणं विना न नश्यति-] पूर्वप्रमाणाहून प्रबल प्रमाणावांचून नष्ट होत नाहीं. [परं च वेदान्तात् प्रबलं मानं न ईक्ष्यते-] पण वेदान्ताहून प्रबल प्रमाण तर कांहीच दिसत नाहीं.

प्रकाश:- व्यवहारांत सुद्धां योग्य प्रमाणजन्य ज्ञानाचा त्याच्याहिपेक्षां दुसऱ्या प्रबल प्रमाणानें बाध झाल्यावांचून नाश होत नाहीं; असें आपण सर्वत्र पाहतों. त्याच न्यायानें ब्रह्मात्मैक्य ज्ञान खोटें ठरवावयास वेदान्ताहून प्रबल असें कोणतें तरी प्रमाण पाहिजे. पण अनुभवरूप वेदान्ताहून प्रबल प्रमाण तर दिसत नाहीं. तस्मात् हें वेदान्तवाक्यजन्य ब्रह्मात्मैक्यज्ञान त्रिकालाबाधित आहे; ही गोष्ट सिद्ध झाली. ॥१०८॥

-ह्या भूतविवेकाख्य द्वितीय प्रकरणाच्या अध्ययनाचें फल सांगून आतां त्याचा उपसंहार करितात-

तस्माद्वेदान्तसंसिद्धं सदद्वैतं न बाध्यते ।
अन्तकालेऽप्यतो भूतविवेकान्निर्वृति:स्थिता ।।०९

अन्वयार्थ- [तस्मात् वेदान्तसंसिद्धं अद्वैतं सत्-] यास्तव वेदान्तद्वारा पूर्णपणें सिद्ध झालेलें अद्वैतरूप सत् [अन्तकाले अपि न बाध्यते-] अन्तकालीं सुद्धां बाधित होत नाहीं. [अत: भूतविवेकात् निर्वृति: स्थिता भवति-] तस्मात् भूतविवेक केल्यानें मोक्षसुखप्राप्ति होते, हें सिद्ध झालें.

प्रकाश:- प्रथम प्रकरणाप्रमाणेंच या द्वितीय प्रकरणावरून सुद्धां सर्व वेदान्ताचें, अद्वैतात्मरूप व नित्यशुद्धबुद्धमुक्तस्वभाव अशा ब्रह्माचे ठिकाणींच, तात्पर्य आहे ही गोष्ट सिद्ध हाते. शिवाय ह्या द्वितीय प्रकरणाचें, 'सगुण ब्रह्मामध्यें सर्व शास्त्राचें पर्यवसान आहे' अशा अर्थाचा जो ईश्वरविषयक प्रतिबंध त्याचें निराकरण करण्यांतहि, तात्पर्य आहे. कारण 'सद्‌द्वैतं श्रुतं' इत्यादि शब्दांनीं प्रकरणाचा आरंभ करून 'तस्माद्वेदान्तसिद्धं सदद्वैतं' असा उपसंहार केला आहे. 'एकमेवाद्वितीयकं' 'नामरूपं नास्ताम्' 'सद्वस्तुनो भेदत्रयं प्राप्तं निवार्यते' 'ततो नावयवा: शंक्या०' इत्यादि अभ्यास; 'अस्पर्शयोगो नामैष०' इत्यादि अपूर्वता; 'अद्वैते धी: स्थिरा भवेत्' 'पुमानेष जीवन्मुक्त इतीर्यते०' इत्यादि फल; 'कृष्णोऽर्जुनायाह जगतस्त्वेकदेशतां०' हा अर्थवाद व 'सत्तत्त्वमाश्रिता शक्ति:' 'वर्णा भित्तिगता भित्तौ चित्रं०' इत्यादि युक्ति ह्या सहा तात्पर्य लिंगावरून छान्दोग्यादि वेदान्ताचें अद्वैत ब्रह्मामध्येंच तात्पर्य आहे असें सिद्ध केलें आहे. ॥१०९॥

इति श्रीविद्यारण्यमुनिविरचितायां पंचदश्यां महाभूतविवेक: । २